रायगड, सोमवार दि. १६ ऑक्टोबर २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

● तुळजाभवानी देवीची रविवारी सिंहासनावर प्रतिष्ठापना करण्यात आली.

आदिशक्तीच्या जागराचा आरंभ

साडेचार हजार ठिकाणी घटस्थापना

| अलिबाग | प्रतिनिधी |

गणरायाच्या विसर्जनानंतर दुर्गादेवीच्या आगमनाची लगबग गेल्या अनेक दिवसांपासून सुरु होती. अखेर ही उत्कंठा संपली आहे. रविवारी जिल्ह्यात चार हजार ६६२ ठिकाणी घटस्थापना करण्यात आली. त्यात एक हजार ३२८ ठिकाणी दुर्गादेवी, तीन हजार १४८ ठिकाणी घट व १८६ ठिकाणी छायाचित्रांची स्थापना करण्यात आली. वाजत गाजत देवीचे स्वागत करण्यात आले असून, नऊ दिवस दसऱ्यापर्यंत ●➤ पान २ वर

समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

१२ ठार, २३ जखमी

टेम्पो ट्रॅव्हलरची ट्रकला धडक

| संभाजीनगर | वृत्तसंस्था |

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाचा पहिला टप्पा राज्यातील जनतेसाठी सुरू होऊन काही महिनेच झाले आहेत. परंतु, हा महामार्ग सातत्याने वेगवेगळ्या अपघातांमुळे चर्चेत असतो. शनिवारी मध्यरात्री समृद्धी महामार्गावर बुलढाण्याहून नाशिकला जाणाऱ्या खासगी टेम्पो ट्रॅव्हलरने रस्त्याकडेला उभ्या असलेल्या ट्रकला धडक दिली. या अपघातात ६ वर्षांच्या एका चिमुकल्यासह १२ जणांचा मृत्यू झाला असून २३ जण जखमी झाले आहेत.

या टेम्पो ट्रॅव्हरलमध्ये एकूण ३५ प्रवासी होते. समृद्धी महामार्गाच्या वैजापूर येथील जांबरगाव टोल नाक्याजवळ ही घटना घडली .ट्रॅव्हल्स बसमधील प्रवासी बुलढाणा जिल्ह्यातील सैलानी बाबा येथील दर्ग्याचे दर्शन घेऊन परत जात असताना त्यांच्या वाहनाचा अपघात झाला.

समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातासाठी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जबाबदार असल्याचे सांगत दोन अधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात आले आहे. या दोन अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रदीप राठोड, नितीनकुमार गणोरकर असे या निलंबित करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे नाव असून दोघेही आरटीओ सहाय्यक निरीक्षक आहेत.ट्रकचा चालक पोलिसांच्या ताब्यात असून दोनही आरटीओ अधिकाऱ्यांचा पोलीस शोध घेत आहेत.

जखमी झालेल्या १४ जणांना छत्रपती संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयात आणि नऊ जखमींना वैजापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ●➤ पान २ वर

आजचा अग्रलेख

जरांगेअण्णा, सबुरीने

वेधक

ताजमध्ये बॉम्ब ठेवल्याचा फोन

मुंबई : हॉटेल ताजमध्ये बॉम्ब ठेवल्याचा फोन करणाऱ्याला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी तरुणाने असे कृत्य का केले याचा पोलीस तपास करत आहे. धरमपाल सिंह असे तरूणाते नाव आहे. तो नवी दिल्ली येथील लक्ष्मीनगर भागातील रहिवासी आहे.१४ ऑक्टोबर रोजी एकने मुंबई फायर ब्रिगेड कंट्रोलला फोन करून ताजमध्ये बॉम्ब ठेवल्याचा फोन केला. ताज हॉटेलमध्ये बॉम्बचा स्फोट करणार असून तुम्हाला हवे ते करा, असे तो म्हणाला.

आपले अध्यक्ष कधीच तुरुंगात गेले नाही : पवार

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी पक्षाच्या मुंबई अध्यक्षपदाच्या निवडीवरून बंडखोर अजित पवार गटाला टोले लगावले. यावेळी शरद पवारांनी काही जुन्या सहकाऱ्यांनी आपल्याला दिल्लीच्या कोर्टात नेले आणि दोन ठिकाणी खटले दाखल केले आहेत, असंही म्हणाले .ते म्हणाले, मी दोन तीन दिवसांपूर्वी वर्तमानपत्रात वाचलं की, कधी काळी आपल्याबरोबर काम करणाऱ्या लोकांनी वेगळा रस्ता स्विकारला आहे. त्यांनीही त्यांच्या अध्यक्षाची निवड केली आहे. फरक एवढाच आहे की, ●➤ पान २ वर

कळवा रुग्णालय; प्लास्टर कोसळले

ठाणे : ठाणे महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात छताचे प्लास्टर कोसळल्याची घटना रविवारी मध्यरात्री उघडकीस आली. या घटनेत रुग्णालयातील वॉर्डबॉय जखमी झाला असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. रविवारी मध्यरात्री रुग्णालयातील तळमजल्यावरील एका कक्षात छताचे प्लास्टर कोसळले. कक्षामध्ये वॉर्डबॉय उपस्थित होता. त्याच्या हाताला आणि डोक्याला जखम झाली आहे. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

चंद्रकांत पाटलांवर शाईफेक

| सोलापूर | वृत्तसंस्था |

सोलापूर जिल्ह्याचे नवनियुक्त पालकमंत्री चंद्रकांत पाटील हे प्रथमच रविवारी रात्री सोलापुरात आले असता शासकीय विश्रामगृहात त्यांच्या अंगावर निळी शाई फेकण्यात आली. या घटनेमुळे तेथे गोंधळ उडाला.

शासकीय नोकरभरतीचे खासगीकरण करण्याच्या धोरणाच्या निषेधार्थ एका संघटनेच्या कार्यकर्त्याने पाटील यांच्या अंगावर निळी शाई फेकली.

दरम्यान, पोलिसांनी अजय मैंदर्गिकर नावाच्या तरूणाला जागेवर ताब्यात घेतले. या घटनेमुळे शासकीय विश्रामगृह परिसरात तणावाचे वातावरण पसरले होते. पालकमंत्री पाटील यांचे रात्री सात रस्त्यावरील शासकीय विश्रामगृहात आगमन झाले. त्यावेळी पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता. गेल्या महिन्यात याच शासकीय विश्रामगृहात तत्कालीन पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना धनगर आरक्षण कृती समितीचा समन्वयक यांच्या अंगावर शेखर बंगाळे याने धनगर आरक्षण प्रश्नावर लक्ष वेधत निवेदन देताना त्यांच्या डोक्यावर भंडारा उधळला होता.

शासकीय विश्रामगृहात येणाऱ्या प्रत्येक मंत्र्याच्या भेटीप्रसंगी ●➤ पान २ वर

पालीमध्ये वादळी पाऊस

| पाली | वार्ताहर |

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीत रविवारी (दि.१५) सायंकाळी विजांचा कडकडाट व ढगांच्या गडगडाटासह आलेल्या वादळी पावसामुळे काही ठिकाणी नुकसान झाले. यावेळी घरे व इमारतीवरील पत्रे उडाले.

येथील भोईआळी समोर सिद्धिविनायक वास्तूचे पत्रे वादळी वाऱ्यात उडून दूरवर फेकले गेले. तर काही घरांवरील ●➤ पान २ वर

एसटीची हातगाडीला धडक

महिला जखमी

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबागहून महाजनेकडे जाणाऱ्या एसटी बसची रस्त्याच्या बाजूला असलेल्या हातगाडीला जोरदार धडक लागली. या धडकेत फुल विक्रेती महिला जखमी झाली असून, तीचे खुप आर्थिक नुकसान झाले आहे. ही घटना रविवारी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास घडली.

अलिबाग एसटी बस आगारातून दुपारी साडेतीन ते पावणे चार वाजण्याच्या सुमारास एम. एच. १४ बी. टी. २६२० या क्रमांकाची एसटी बस महाजनेकडे निघाली. चार वाजण्याच्या सुमारास कुरुळ येथे आल्यावर चालकाचा बसवरील ताबा सुटला. रस्त्याच्या डाव्या बाजूला असलेल्या हातगाडीला जोरदार धडक लागली. ●➤ पान २ वर

फुग्यात हवा भरणाऱ्या सिलिंडरचा स्फोट

| लातूर | वृत्तसंस्था |

लातूर शहरामध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. फुग्यामध्ये हवा भरणाऱ्या सिलिंडरचा भीषण स्फोट झाला. त्यामुळे फुगे विक्री करणाऱ्याचा मृत्यू झाला असून सात लहान मुले गंभीर जखमी झाली आहेत. लातूर शहरातील तावरजा कॉलनी येथे ही घटना घडली असून जखमी मुलांवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरु आहेत. सिलिंडरचा स्फोट झाल्यानंतर परिसरात मोठा आवाज झाला होता. दुर्दैवाने फुगे विक्रेत्याचा जागीच मृत्यू झाला आहे.



राज्यभरात ईडीची कारवाई

जळगाव, मुंबई, ठाणे, सिल्लोड, कच्छमधील ३१५ कोटींच्या ७० मालमत्ता जप्त

| मुंबई | वृत्तसंस्था |

राज्यभरात ईडीने मोठी कारवाई केली आहे. ईडीने जळगाव, मुंबई, ठाणे, सिल्लोड आणि कच्छमधील ७० स्थावर मालमत्ता आणि जंगम मालमत्ता तात्पुरत्या स्वरुपात जप्त केल्या आहेत. या मालमत्तांची किंमत अंदाजे ३१५ कोटी आहे.

१३ ऑक्टोबर २०२३ रोजी पीएमएलए, २००२ अंतर्गत ही कारवाई करण्यात आलेली आहे. राजमल लखीचंद ज्वेलर्स प्रायव्हेट लिमिटेड, आरएल गोल्ड व मनराज ज्वेलर्स आणि त्यांचे प्रवर्तक ईश्वरलाल शंकरलाल जैन लालवानी, मनीष ईश्वरलाल जैन लालवानी आणि इतरांनी मिळवलेल्या बेनामी मालमत्तांचा समावेश आहे. ईडीने जळगाव, नाशिक आणि ठाणे (महाराष्ट्र) येथील राजमल लखीचंद समूहाच्या १३ ठिकाणी छापे टाकले. या छापेमारीत गुन्हेगारी कागदपत्रांसह सोने, चांदी आणि हिऱ्यांचे दागिने, सराफा आणि भारतीय चलन जप्त करण्यात आले.

१.११ कोटी रुपयांची रक्कम जप्त

ईडीने केलेल्या कारवाईत राजमल लखीचंद ग्रुपच्या ६० मालमत्तेचा तपशील हाती लागला आहे. पैशांच्या अपहार प्रकरणी ईडीने जळगाव, नाशिक आणि ठाण्यात १३ ठिकाणी शोध मोहीम राबवली. अंमलबजावणी संचालनालयाने गेल्या तीन दिवसात पैशांच्या अपहार प्रकरणात ईश्वरलाल जैन आणि साथीदारांच्या जवळपास १३ ठिकाणांची झडती घेतली.

दिल्ली पुन्हा भूकंपाने हादरली

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

रविवारी दुपारी ४ वाजून ८ मिनिटांनी दिल्ली-एनसीआरमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. एनसीआरमधील फरिदाबाद, गाझियाबाद, नोएडा, ग्रेटर नोएडा आणि गुरुग्राममध्येही भूकंपाचे धक्के जाणवले. सध्यातरी या भूकंपामध्ये कोणतीही हानी झाल्याची माहिती नाही.मागील दोन आठवड्यात दिल्लीला दुसऱ्यांदा भूकंपाचा धक्का जाणवला आहे. हे भूकंपाचे धक्के इतके जोरदार होते की लोक घाबरले आणि घराबाहेर पळाले.

३०० जणांना दिले प्रशिक्षण

आपदा मित्र आपदग्रस्तांसाठी वरदान

| अलिबाग | प्रमोद जाधव |

आपत्कालीन परिस्थितीत प्रशासनाच्या खांद्याला खांदा लावून काम करण्यासाठी आपदा मित्रांची निवड करण्यात आली आहे. जिल्ह्यातील ३०० अपदा मित्रांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. ते आपदग्रस्तांसाठी वरदान ठरत आहेत.

निसर्ग चक्रीवादळाबरोबरच तौक्ते चक्रीवादळाच्या मोठ्या हानीनंतर स्थानिकांच्या मदतीने आपत्कालीन परिस्थितीवर मात करण्यासाठी जिल्हा ●➤ पान २ वर

> आपत्कालीन परिस्थितीत समस्या सोडविण्यासाठी स्थानिकांचा हातभार महत्वाचा असतो. त्यामुळे प्रशासनाने आपदा मित्रांची निवड केली आहे. ३०० अपदा मित्रांना प्रशिक्षण देऊन त्यांना प्रात्यक्षिक धडेदेखील देण्यात आले आहेत.
>
> - सागर पाठक, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, रायगड

विनामूल्य स्वयंसेवक म्हणून बजावतात भूमिका

प्रशासनाच्या सोबत आपत्कालीन परिस्थिती काम करण्यासाठी आपदा मित्र नेण्यात आले आहे. यामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रातील तरुण मंडळी सहभागी झाले आहेत. विनामूल्य स्वयंसेवक म्हणून ही मंडळी सेवा देत आहेत. अतिवृष्टीच्या काळात तसेच महाड येथे २० मार्चला क्रांतीदिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुयायींच्या मदतीसाठी चवदार तलाव परिसरात यांची निवड केली जात आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यांना 'मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती'

३० नोव्हेंबरपर्यंत विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची संधी; केंद्राकडून मिळणार दिव्यांग विद्यार्थ्यांना लाभ

। रायगड । प्रतिनिधी ।

दिव्यांग विद्यार्थ्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी केंद्र सरकारमार्फत राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलद्वारे इयत्ता नववी आणि दहावीच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना 'मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती' जाहीर करण्यात आली आहे. या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून दिव्यांग विद्यार्थ्यांना ३० नोव्हेंबरपर्यंत अर्ज करता येणार आहेत.

राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलवरील सर्व योजनांसाठी लाभार्थ्यांचे बायोमेट्रिक प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे. या योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांनी दिलेल्या कालावधीत ऑनलाईन अर्ज भरावेत, असे आवाहन शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी केले आहे. प्रत्येक अनुदानित शाळांनी त्यांच्याकडील शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांना अर्ज करण्यास मदत करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. विद्यार्थी स्वतंत्रपणे देखील शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू शकणार आहेत. सर्वसामान्य कुटुंबातील दिव्यांग विद्यार्थ्यांनाही उच्च शिक्षण घेता यावे, आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात खंड पडू नये या हेतूने ही योजना सुरु करण्यात आली आहे.

शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष...

- अनुदानित शाळांतील इयत्ता नववी व दहावीचे विद्यार्थी या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू शकतात.
- शिष्यवृत्ती एका इयत्तेला एका शैक्षणिक वर्षासाठीच लागू राहणार आहे.
- विद्यार्थ्यांचे दिव्यांगत्वाचे प्रमाण ४० टक्के किंवा त्याहून जास्त असावे.
- सक्षम अधिकाऱ्याचे दिव्यांगत्वाचे वैध प्रमाणपत्र कायद्यानुसार असावे.
- पालकांचे वार्षिक उत्पन्न दोन लाख ५० हजार रुपयांपेक्षा जास्त नसावे.
- पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांना नऊ हजार ते १४ हजार ६०० रुपये इतकी शिष्यवृत्ती मिळते.

अर्ज करण्याच्या महत्वपूर्ण तारखा...

१) ऑनलाइन अर्ज करण्याची मुदत : ३० नोव्हेंबर
२) शाळास्तरावरील अर्ज पडताळणी : १५ डिसेंबर
३) जिल्हास्तरावर अर्ज पडताळणी : ३० डिसेंबर

ॲड. दत्ता पाटील विधी महाविद्यालयातर्फे वॉक फॉर फ्रिडम रॅली

। रायगड । प्रतिनिधी ।

ॲड. दत्ता पाटील विधी महाविद्यालय आणि व्हिजन रेस्क्यु अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने वॉक फॉर फ्रिडम रॅलीचे आयोजन शनिवारी (दि.१४) करण्यात आले होते.

वॉक फॉर फ्रीडम हा मानवी तस्करीविरुद्ध जगातील सर्वात मोठा जनजागृती वॉक-२१ या नानफा संस्थेने आयोजित केला होता. रॅलीची सुरुवात हिराकोट तलावापासून ते विधी माहाविद्यालयापर्यंत करण्यात आली होती. या रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी मानवी तस्करीनिषेधार्थ काळे कपडे परिधान करुन विविधप्रकारच्या घोषवाक्यांचे फलक प्रदर्शित केले.

रॅली विधी महाविद्यालयात आल्यानंतर शपथविधी कार्यक्रमाचे आयोजन स्व.लोकनेते दत्ता पाटील खुला रंगमंच येथे करण्यात आले होते. विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य ॲड.नीलम हजारे यांनी मानवी तस्करीविरोधी शपथेचे वाचन केले आणि उपस्थित सर्वांनी शपथ ग्रहण केली.

जनता शिक्षणाचे मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांनी आपल्या मनोगतात मानवी तस्करीमध्ये केवळ देह व्यवसायासाठी मानवांची तस्करी नव्हे तर भिकारी,अवयव विक्री, गुलामी,इ.कारणांसाठी सुध्दा केली जाते याबाबत चिंता व्यक्त केली. त्याकरिता युवांनी सहभागी होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. नंदकुमार पाटील यांनी संस्थेच्या कार्याबद्दल माहिती दिली.शपथविधी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी मैथिली भगत आणि आभार प्रदर्शन मानव टेमकर यांनी केले.

या रॅलीनिमित्त अलिबाग शहरातील व्हिजन रेस्क्यु संस्थेचे पदाधिकारी,समन्वयक केतकी पाटील, ॲड.दत्ता पाटील विधी महाविद्यालयासोबतच ,जे.एस.एम.महाविद्यालय आणि,पी एन.पी.महाविद्यालयातील प्रा.कैलास राजपूत,प्रा.पल्लवी पाटील, आणि विद्यार्थी सहभागी झाले होते.

जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, जे.एस.एम.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल पाटील ,विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य ॲड.नीलम हजारे, जे.एस.एम.महाविद्यालय एन.एस.एस.विभाग कार्यक्रम अधिकारी प्रा.अश्विनी आठवले आणि डॉ.पंकज घरत सांस्कृतिक प्रमुख प्रा.श्वेता पाटील आणि डी.एल.एल.ई विभाग प्रमुख प्रा.लोणकर विधी महाविद्यालयाचे आय.क्यु.ए.सी.समन्वयक, डॉ.संदिप घाडगे, प्रा.मनोज धुमाळ, प्रा.समिक्षा म्हात्रे, प्रा.पियुषा पाटील, विद्यार्थी,शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, उपाध्यक्ष डॉ.साक्षी पाटील,विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य ॲड. नीलम हजारे तसेच पी.आर.ओ.डा.सिमंतिनी ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली विधी महाविद्यालयातील महिला विभाग कक्ष आणि सांस्कृतिक समिती अंतर्गत प्रा.निलम म्हात्रे आणि प्रा.चिन्मय राणे,विद्यार्थी अनिकेत मोरे, व्हिजन रेस्क्यु टीम लिडर केतकी मंदा नंदकुमार पाटील यांनी या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

एकविरा यात्रेमुळे वाहतुकीत बदल

। पुणे । वृत्तसंस्था ।

मावळ तालुक्यातील वेहेरगांव, कार्ला येथील एकविरा देवीच्या मंदिर परिसरात १५ ऑक्टोबरपासून नवरात्रोत्सव यात्रा सुरु होत आहे. यात्रा कालावधीत वाहतूक कोंडी होऊ नये, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी याकरिता जड, अवजड वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. याबाबतचे आदेश जिल्हा प्रशासनाने पारित केले आहेत . वेहेरगांव, कार्ला येथे वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून कार्ला फाटा ते श्री एकविरा देवी पायथा मंदिर दरम्यान १५ ते २४ ऑक्टोबर या कालावधीत पूर्ण वेळ जड, अवजड वाहनांना प्रवेश बंद राहील. २१ ते २३ ऑक्टोबर या तीन दिवसांच्या कालावधीत सकाळी सहा ते रात्री दहा वाजेपर्यंत जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर लोणावळा-कुसगांव बुद्रुक पथकरनाका-वडगांव फाटामार्गे पुण्याकडे जाणारी जड-अवजड वाहनांची वाहतूक बंद करुन ती खंडाळा-कुसगांव पथकर नाकामार्गे नवीन द्रुतगती मार्गावरुन पुण्याकडे जातील. दरम्यान, २१ ते २३ ऑक्टोबर या तीन दिवसांत सकाळी सहा ते रात्री दहा या वेळेत जुना पुणे-मुंबई महामार्गावरुन वडगांव तळेगांव फाटा लोणावळा मुंबईकडे जाणारी जड-अवजड वाहनांची वाहतूक बंद करुन ती तळेगाव फाटा येथून उर्से खिंड, उर्से पथकरनाका मार्गे नवीन द्रुतगती मार्गावरून मुंबईकडे जातील. हे आदेश लागू केल्यानंतर काही विधीग्राह्य मुद्दा उपस्थित झाल्यास त्यानुसार सुधारित आदेश काढण्यात येणार आहेत.

अविष्कार फोटो स्पर्धेच्या वेडिंग विभागात

सौरभ नाझरेंच्या छायाचित्राला सर्वोत्कृष्ट पुरस्कार

। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।

फोटो सर्कल ठाणे आयोजित अविष्कार फोटो स्पर्धेत मुरूडचे सौरभ नाझरे यांना वेडिंग विभागात राज्यातून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. स्पर्धेत हजारो फोटो सहभागी झाले होते. त्यातून सौरभचा लग्नातील विशेष फोटो निवडण्यात आला. त्याला १० हजारांचे रोख पारितोषिक व सन्मानपात्र, चषक देण्यात येणार आहे. ही स्पर्धा सहा विविध विभागात झाली. यावेळी सर्व विजेत्यांना १ लाख ९५ हजारांची रोख परितोषिके देण्यात येणार आहेत.२४ ते २६ नोव्हेंबर २०२३ रोजी ठाण्यात भव्य प्रदर्शन भरवण्यात येणार असून, त्यावेळी परितोषिक वितरण होणार आहे.

सौरभ नाझरे गेली १२ वर्षे व्यावसायिक फोटोग्राफी करत आहे. वृत्तपत्रातदेखील काम करत आहे. निसर्गचित्रांसोबत लग्नसमारंभात विशेष फोटोग्राफीत प्राविण्य मिळवल्याने नाविन्यपूर्ण फोटो शूटसाठी प्रसिद्ध आहे. रायगड फोटोग्राफी असोसिएशनच्या २०२३ फोटो स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला होता. वडील सुधीर नाझरे यांचा पारंपरिक छायाचित्रणाचा व्यवसाय असल्याने वडिलांचे मार्गदर्शन घेऊन फोटोग्राफी क्षेत्रात त्याने उंच भरारी घेतली आहे. या स्पर्धेचे परीक्षण जागतिक पातळीचे परीक्षक शरमली दास (कलकत्ता), तृप्ती रॉय (गोवा), गुरुदास दुवा (इंदोर), रूपक डे (लखनौ), शिरीष साने (मुंबई), शशांक रणजित (मुंबई) यांनी केले.

चिरनेरच्या मुख्य रस्त्यांवर सांडपाणी

प्रशासक आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष; ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट

। चिरनेर । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील चिरनेर गावातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांवर मागील १५ दिवसांपासून सांडपाणी वाहत असून, येथील ग्रामस्थांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे वयोवृद्ध महिला आणि ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

यामध्ये चिरनेर गावातील कातळपाडा, राजाराम केणी ते किशोर परदेशी यांच्या घरासमोर, जुने एसटी स्टँड पासून कातळपाडा मार्गाकडे, तर जुने एसटी स्टँडपासून राम मंदिरापर्यंत चिरनेर गावातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात गटारांचे पाणी वाहत आहे. चिरनेर येथील ग्रामस्थ व महिलांनी गटारांच्या पाण्याचा बंदोबस्त करावा याबाबत ग्रामपंचायतीचे प्रशासक व ग्रामविकास अधिकारी यांच्या निर्देशनास आणून देऊनही दुर्लक्ष केले जात आहे.

> चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील तुंबलेल्या गटारांचे पाणी रस्त्यावर वाहत आहे. त्याचा त्रास गावातील ग्रामस्थांना सोसावा लागत आहे. सदरची तुंबलेली गटारे तात्पुरत्या स्वरूपात मोकळी करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या सफाई कामगारांसमवेत चार-पाच मजूर कामाला लावून ते काम करण्यात येईल.
> – एम.जी. पवार,
> ग्रामविकास अधिकारी
> ग्रामपंचायत-चिरनेर

मागील फेब्रुवारी २०२३ पासून प्रशासक बसलेल्या चिरनेर ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक येत्या ५ नोव्हेंबर २०२३ रोजी होत आहे. त्यामुळे या ग्रामस्थांच्या आरोग्याच्या दृष्टीने गटाराच्या पाण्यामुळे होणाऱ्या त्रासाच्या गंभीर समस्येकडे चिरनेरमधील कोणताही राजकीय पुढारी धजावत नसल्याने येथील ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे.चिरनेर ग्रामपंचायतीचे प्रशासक आणि ग्रामविकास अधिकारी थातूरमातुर उत्तरे देऊन या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करीत असून, नव्याने येणाऱ्या सरपंच आणि सदस्यांकडून ही कामे केली जाणार असल्याच्या गमजा मारत असल्याचे बोलले जात आहे.

'विजयभूमी'चा तिसरा दीक्षांत समारंभ

विद्यापीठाच्या २२ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान

। नेरळ । वार्ताहर ।

देशातील एक प्रसिद्ध व निसर्गाच्या सान्निध्यात शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या विजयभूमी विद्यापीठाचा तिसरा दीक्षांत समारंभ पद्मश्री शुभा मुदगल यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी सुनील रोहोकाळे, विद्यापीठाचे अध्यक्ष संजय पडोदे, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अतिश चट्टोपाध्याय आदी मान्यवर उपस्थित होते.

गुरुवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पाच वाजता विजयभूमी विद्यापीठांमध्ये तिसरा दीक्षांत समारंभ पार पडला. त्यामध्ये ६ विद्यार्थ्यांना बॅचलर ऑफ म्युझिक तर ४ विद्यार्थ्यांना बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन ही पदवी देण्यात आली. तर उर्वरित १२ विद्यार्थ्यांना मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन ही पदवी देण्यात आली आहे. अशा प्रकारे एकूण २२ विद्यार्थ्यांना विजयभूमी विद्यापीठाकडून पदवी प्रदान करण्यात आली आहे.

या समारंभासाठी विद्यापीठाचे प्रशासकीयकुलगुरूडॉ.अश्विनीकुमार शर्मा, सदस्य मनोज शहा, डॉ. व्ही. अ. शास्त्री, कल्पना पडोदे, प्रणव पडोदे, डॉ. शालिनी कालिया, डॉ. प्रशिल सूर्यवंशी, डॉ. आनंद देव जेम्स, प्राध्यापक निलेश थॉमस हे उपस्थित होते. तर, हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रो व्हाइस चान्सलर अनिल पैला, रजिस्ट्रार डॉ. नंदिश हिरेमठ, एडमिन हेड कर्नल संजय दत्ता, राजु पूजारी, कंट्रोल ऑफ एक्झाम अतुल झोपे, मॅनेजर स्टुडंट्स अफेअर भूषण पिंपळकर यांसह विजय विद्यापीठाचे स्टाफ व कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

पान १ वरून

१२ ठार, २३ जखमी

मृतांमध्ये तनुश्री लखन सोळोसे (वय पाच वर्ष), संगीता विलास अस्वले (वय ४०) , पंजाबी रमेश जगताप (३८), रतन जमदाडे (वय ४५), काजल लखन सोळसे (वय ३२), रजनी गौतम तपासे (वय ७०), हौसाबाई आनंद शिरसाट (वय ५८), झुंबर काशिनाथ गांगुर्डे (वय १८),अमोल झुंबर गांगुर्डे (वय १८), सारिका झुंबर गांगुर्डे (वय४०) , मिलिंद हिरामण पगारे (वय ५०) आणि दीपक प्रभाकर केकाने (वय ४७) यांचा समावेश आहे. टेम्पो ट्रॅव्हलरच्या चालकाला झोप लागल्याने हा अपघात झाल्याचे काहींनी सांगितले . जखमी प्रवाशांनी दावा केला आहे की पोलिसांनी एक ट्रक थांबवला होता. हा ट्रक रस्त्याकडेला उभा होता. ट्रकचालक ट्रक काढत असताना टेम्पो ट्रॅव्हलरने मागून धडक दिली. पोलिसांनी अद्याप या अपघाताबद्दल अधिकृत माहिती दिलेली नाही.

जखमी झालेल्या प्रवाशांमध्ये पुजा संदीप अस्वले (वय ३५),वैष्णवी संदीप अस्वले (वय १२),ज्योती दिपक केकाणे (वय ३५),कमलेश दगु म्हस्के (वय ३२),संदीप रघुनाथ अस्वले (वय ३८), युवराज विलास साबळे (वय १८),कमलबाई छबु म्हस्के (वय ७७),संगीता दगडु म्हस्के (वय ६०),दगु सुखदेव म्हस्के (वय ५०),लखन शंकर सोळसे (वय २८),गिरजेश्वरी संदीप अस्वले (वय १०),शांताबाई नामदेव म्हस्के (वय ४०),अनील लहानु साबळे (वय ३२),तन्मय लक्ष्मण कांबळे (वय ०८),सोनाली आप्पासाहेब त्रिभुवन (वय २५),श्रीहरी दिपक केकाणे (वय १२),सम्राट दिपक केकाणे (वय ६०),गौतम भास्कर तपासे (वय ३८),कार्तिक लखन सोळशे (वय ५),धनश्री लखन सोळसे (वय ०८),संदेश संदीप अस्वले (वय १२),प्रकाश हरी गांगुर्डे (वय २४),शंकर (अंदाजे वय ३)यांचा समावेश आहे.जखमी झालेल्या १४ जणांना छत्रपती संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयात आणि नऊ जखमींना वैजापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

आदिशक्तीच्या जागराचा आरंभ

गरबा रास, भजनांच्या कार्यक्रमांसह विविध कार्यक्रम होणार आहेत.

दुर्गादेवीची घटस्थापना करण्यासाठी सार्वजनिक मंडळासह खासगी मंडळाकडूनही जोरदार तयारी गेल्या अनेक दिवसांपासून करण्यात आली. १५ ऑक्टोबर रोजी देवीचे आगमन झाले. दुर्गादेवीची मूर्ती मिरवणुकीने वाजतगाजत आणण्यात आली. जिल्ह्यामध्ये एक हजार ३२७ ठिकाणी देवीच्या मूर्तीची ,तर नेरळमध्ये देवीच्या दोन छायाचित्रांची मिरवणूक काढत देवीचे स्वागत करण्यात आले. पारंपरिक पेहराव करीत विधीवत पूजा करीत देवीची स्थापना करण्यात आली. त्यानंतर देवीला लागणारे नैवेद देण्यात आले. त्यानंतर आरती पूजा करण्यात आली. ठिकठिकाणी भजन ठेवण्यात आले. या भजनांमुळे जिल्ह्यात मंगलमय वातावरण निर्माण झाले. अबालवृध्दांनी या कार्यक्रमात सहभाग घेऊन देवीच्या स्वागताचा आनंद लुटला. २४ ऑक्टोबरपर्यंत भजनांसह सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रम घेतले जाणार आहेत. भजनांच्या स्पर्धादेखील ठेवल्या जाणार आहेत. बाल्या नृत्यांचे सादरीकरणदेखील या नऊ दिवसांच्या कालावधीत होणार आहे. त्यामुळे नऊ दिवस, नऊ रात्र जागरण करून देवीची मनभावे पूजा केली जाणार आहे. नवरात्रौत्सव साजरा करीत असताना कोणताही अनुसूचित प्रकार घडू नये यासाठी रायगड पोलीसदेखील सज्ज झाले आहेत. सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळाच्या ठिकाणी तसेच गर्दीच्या ठिकाणी पोलिसांचा कडक पहारा ठेवला जाणार आहे. त्याची तयारी जोरात केली असल्याची माहिती रायगड पोलिसांनी दिली.

एसटी अपघातामध्ये महिला जखमी

या धडकेत फुल विक्रेती महिला गंभीर जखमी झाली. त्यांच्या हातगाडीसह फुलांचे नुकसान झाले. स्थानिकांनी बसचालकाला पोलिसांच्या ताब्यात दिले. दरम्यान, अलिबाग - बेलकडे रस्त्यावर एका बाजूने वाहतूक कोंडी झाली होती. फुल विक्रेत्या महिलेचे नाव सुरेखा रोटकर असून नवरात्रौत्सवानिमित्त कुरुळ येथील रस्त्याच्या बाजूला स्थानकाजवळ फुल विक्रीचा व्यवसाय करीत होत्या.त्यावेळी हा अपघात झाला. सुदैवाने मोठी हानी टळली.

आपदा मित्र आपदग्रस्तांसाठी वरदान

प्रशासनाने अपदा मित्रांची निवड करण्याचा निर्णय घेतला. १८ वर्षापासून ४० वर्षापर्यंतच्या मंडळींना आपदा मित्रामध्ये सामावून घेण्यात आले. या उपक्रमाला जिल्ह्यातून शेकडो तरुणांचा सहभाग मिळाला. त्यात २५ ते ३० वयोगटातील तरुणांनी सहभाग घेऊन अपदा मित्र होण्याचा निर्णय घेतला. जिल्ह्यात ३०० आपदा मित्रांची निवड करण्यात आली. त्यांना महाड, माणगाव, पनवेल, पेण या ठिकाणी प्रशिक्षण देऊन आपत्कालीन परिस्थितीशी सामना करण्याचे धडे दिले. अतिवृष्टीत अथवा अन्य आपत्कालीन परिस्थितीत गरजुंना मदत करण्याबरोबरच आपदग्रस्तांना अधार देण्याचे काम त्यांच्यामार्फत केले जात आहे. यामध्ये पुरुषांसह महिलांचादेखील सहभाग आहे.

पालीमध्ये वादळी पाऊस

पत्रे देखील उडाले. तसेच इमारतीवरील पत्रे भातशेतीत उडाल्याने भात पिकांचे नुकसान झाले. सुदैवाने हे पत्रे मोकळ्या जागेत कोसळले, त्यामुळे जीवित हानी झाली नाही. मात्र पत्रे तुटून मोठे नुकसान झाले आहे. परतीच्या पावसाने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

चंद्रकांत पाटलांवर शाईफेक

आंदोलनाच्या रूपाने कोणतेही आक्षेपार्ह प्रकार घडू नयेत म्हणून पोलिस सतर्क आहेत. या पार्श्वभूमीवर चंद्रकांत पाटील यांच्या आगम नाप्रसंगी विश्रामगृहात येणा-या प्रत्येकाची पोलीस कसून तपासणी करीत होते. यापूर्वी विखे-पाटील यांच्यावर भंडारा उधळलेल्या शेखर बंगाळे हा सुध्दा चंद्रकांत पाटील यांना निवेदन देण्यासाठी आला होता. परंतु पोलिसांनी सतर्कता बाळगून त्यास ताब्यात घेतले. मात्र त्यानंतर अजय मैंदर्गिकर नावाच्या तरूणाने पोलिस सुरक्षा पार करून पालकमंत्र्यांना भेटताना त्यांच्या अंगावर शाईफेक केली. त्याने काळा झेंडा दाखवत, भारतीय जनता पार्टी मुर्दाबादच्या घोषणा दिल्या आणि लगेचच शाईफेक केली. त्यामुळे गोंधळ झाला.

आपले अध्यक्ष कधीच तुरुंगात गेले नाही : पवार

तुम्ही ज्यांची निवड केली ते कधीच तुरुंगात गेलेले नव्हते. दुसऱ्या बाजूचे कुठे गेले होते हे मला माहिती नाही. मात्र, तुम्हाला तो सर्व इतिहास माहिती आहे.

''आजची पक्षाची ही बैठक नवा रस्ता दाखवणारी, आत्मविश्वास देणारी आहे. याचा मला आनंद आहे. सध्या इथं आपण जयंत पाटलांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीचं काम करतो आहे. मात्र, काही मित्रांनी आपल्याला दिल्लीच्या कोर्टात नेलं आहे. आपल्यावर दोन ठिकाणी खटले दाखल आहेत. एक खटला निवडणूक आयोगात आहे. तेथे सांगण्यात येतंय की, हा पक्ष त्यांचाच आहे,'' असं शरद पवार म्हणाले.

शरद पवार पुढे म्हणाले, ''दुसरा खटला सर्वोच्च न्यायालयात दाखल आहे. या दोन्ही ठिकाणी तुमच्या खऱ्या राष्ट्रवादीला संघर्ष करण्याचा प्रसंग आपल्या जुन्या सहकाऱ्यांनी आणला. मला खात्री आहे की, आज ना उद्या निकाल लागेल त्यावेळी सामान्य माणसाच्या अंतःकरणात बसलेली खरी राष्ट्रवादी कोण याचा निकाल आपल्या बाजूने होईल आणि चित्र बदलेल.''

''आपल्या पक्षाच्या वतीने ही कोर्ट कचेरी चालू आहे. त्यात निष्णात वकील काम करत आहेत. जितेंद्र आव्हाड आणि सुप्रिया सुळे या सर्व कोर्टाच्या कामात माहिती घेण्यासाठी उपस्थित असतात. तसेच वकिलांना लागणारी मदत देत असतो. यामुळे दिवसेंदिवस आपलं म्हणणं सत्यावर आधारित आहे हे लोकांसमोर येईल, याची मला खात्री आहे,'' असंही शरद पवारांनी नमूद केलं.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. सुरेंद्र मधुकर तांबे यांनी खालील वर्णनाची बिनशेती मिळकत तिचे मालक श्रीमती विद्या अंबरिष रणदिवे यांच्याकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे तपशीलवार वर्णन पुढीलप्रमाणे.

मौजे-बोपेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन

सर्वे नं.	हिस्सा नं./प्लॉट नं.	क्षेत्र चौ.मी.	आकार
३०	२/अ/४/ब/४	१८८.००	१८.८०

वर नमूद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १५/१०/२०२३

ॲड. ज्ञानेश्वर हरिश्चंद्र राणे
१२, तय्यब अपार्टमेंट, बाजारपेठ,
रेल्वे स्टेशनजवळ, नेरळ, ता. कर्जत
जि. रायगड ४१० १०१
मो. ९४२२०७१११२

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील नमूद केलेली विद्यमान मालक आशिष शशिकांत चोक्शी, विश्वास शशिकांत चोक्शी, भारती शशिकांत चोक्शी, यांच्या मालकीची मिळकत त्यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले असून तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक व आमचे अशिल यांचे दरम्यान झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार रू.पैसे
येलवणे ता. अलिबाग जि. रायगड	२२/१४	०-२८-००	०.२२
येलवणे ता. अलिबाग जि. रायगड	२२/१५	०-४९-००	०.३७
येलवणे ता. अलिबाग जि. रायगड	२२/१६	०-६९-००	०.५०

मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी. हे कळावे.

अलिबाग
दिनांक : १५/१०/२०२३

ॲड. विश्वनाथ डी. भगत
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
मोबा नं. ८९७५९३५८०१

क्षणचित्रे

पायी दिंडीचे आयोजन

महाड : जगद्गुरु श्री नरेंद्र महाराज यांच्या ५८ व्या जन्मदिनाच्या निमित्ताने स्वस्वरूप सांप्रदाय मुंबई उपपिठातर्फे वसई ते नाणिजधाम, रत्नागिरी अशा भव्य वसुंधरा पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले. भव्य पायी दिंडी महाडमध्ये दाखल झाली. यावेळी शेकडो भक्तगण यामध्ये सामील झाले होते. शहरातील मुख्य रस्त्यांसह महामार्गावरील वातावरण सुद्धा या दिंडीच्या तालाने भक्तीमय झाले होते.

देव बसले घटावर

सुकेळी : नवरात्रौत्सवास सुरूवात झाली आहे. प्रत्येक कुटुंबीयांचे कुलदैवत असलेल्या घरी देव घटावरती बसवून घटस्थापना करण्यात आली. यावेळी सर्वच कुटुंबातील सदस्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसुन येत होता. नऊ दिवस चालणाऱ्या उत्सवात दुर्गा देवीच्या नऊ रुपांची पूजा केली जाणार असुन कुलदैवतांसमोर नऊ दिवस आरती, हरिपाठ, भजन तसेच जागरणाचे विविध कार्यक्रम होणार आहेत.

वाचन प्रेरणा दिन साजरा

मुरुड जंजिरा : भारताचे माजी राष्ट्रपती थोर शास्त्रज्ञ डॉक्टर ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून मुरुड तालुक्यातील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव येथे मोठ्या उत्सहात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ, पर्यवेक्षिका अर्चना खोत, भारत चव्हाण, ग्रंथपाल संजय करडे आदी मान्यवर उपस्थित होते.

भाविकांमध्ये उत्साह

पनवेल : शहरातील गावदेवी पाडा येथील श्री स्वामी समर्थ मठात नवरात्रीनिमित्त आदिमाया स्वरूप स्वामी समर्थ नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नवमीपर्यंत मठात विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. नवरात्रीनिमित्त मठात फुलांची मनमोहक आरास करण्यात करण्यात आली आहे. घटस्थापनेच्या पहिल्या दिवशी स्वामी समर्थांचे ''शैल्यपुत्री'' रुपातील देवीचे भाविकांनी मनोभावे दर्शन घेतले.

खोटे दागिने देऊन कर्ज

पनवेल : खारघर वसाहतीमधील मुथूट फिनकॉर्पच्या कार्यालयात खोटे दागिने तारण ठेवून त्याद्वारे लाखो रुपयांचे कर्ज घेण्याचा प्रकार उघड झाला. कर्मचाऱ्याच्या सर्तकतेमुळे सदरच्या व्यक्तीला पकडण्यात यश आले आहे. कर्मचाऱ्यांनी त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. सुमेधकुमार शिवानंदन (४९) याच्यावर फसवणुकीचा गुन्हा खारघर पोलिसांनी दाखल केला आहे.

'दुहेरी कर' विरोधातील आंदोलनाला मिळतेय बळ

- विविध सामाजिक संस्थांनी दिला पाठिंबा
- आंदोलनांची व्याप्ती वाढवण्याचा निर्धार

। पनवेल । वार्ताहर ।

महानगरपालिका आणि सिडको यांच्या दुहेरी कराच्या विरोधात परिवर्तन सामाजिक संस्थेने यशस्वीपणे चालू ठेवलेल्या लढ्याला एकता सामाजिक संस्थानेही पुढाकार घेऊन बळ दिले. या संस्थेने रविवारी कामोठे येथे आयोजित केलेल्या सभेला कामोठेकरांनी प्रचंड प्रतिसाद देत ही लढाई अधिक आक्रमक करण्याचा निर्धार केला.

परिवर्तन सामाजिक संस्थेच्या व्यासपिठावरून महानगरपालिकेने लादलेल्या या जाचक, जूलमी दुहेरी करांचा भरणा न करीत पनवेलकरांनी चालू ठेवलेले हे असहकार आंदोलन अशाचप्रकारे प्रत्येक घराघरात पोहचवण्याचाही निर्धार समस्त कामोठेकरांनी या सभेत केला.

उच्च न्यायालयातही परिवर्तन सामाजिक संस्थेचे महादेव वाघमारे व ॲड. विजय कुर्ले हे या प्रकरणी आक्रमकपणे पाठपूरावा करीत असल्यामूळे सर्व प्रस्थापित राजकारण्यांमध्येही अस्वस्थता निर्माण झाली आहे. महापालिकेच्या प्रशासनाचा अशाप्रकारे जबरदस्ती करवसुलीचे प्रकरण अंगाशी येऊन राजकारण्यांना तोंडघशी पडण्याची भिती वाटत असल्याने एक-दोन वर्षांचा कर माफ करणार असल्याच्या अफवाही हे राजकारणी पनवेलकरांमध्ये पसरवत असल्याचे बोलले जाते. परंतु अशाप्रकारे कितीही अफवा पसरवून पनवेलकरांना राजकारण्यांनी भ्रमित करून पुन्हा मतदारांसमोर येण्याचा प्रयत्न केला, तरी पनवेलकर मात्र यांना आता महानगरपालिका सभागृहात प्रवेश देणार नाहीत, असा निश्चय सभेत केला.

एकता सामाजिक संस्थेने या सभेचे आयोजन केले होते. प्रमुख उपस्थिती ॲड. विजय कुर्ले, ॲड. शिवराज कुंचगे, याचिकाकर्ते महादेव वाघमारे, मा. नगरसेवक प्रमोद भगत, रंजना सलोडिकर, तसेच कामोठे रहिवाशी संघ, जय हरी महिला मंडळ, परिवर्तन युवा मंच, श्री. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, स्वराज प्रतिष्ठान रायगडचा गणराज, आई भवानी मित्र मंडळ, आई भवानी महिला मंडळ, या संस्थांनी सहभाग घेतला होता. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अमोल शितोळे, अल्पेश माने, गौरव पोरवाल, पोपट आवारी, सुरेश खरात, संगीता राऊत, संगीता पवार, हरीश बाबरीया बाळासाहेब सकपाळ आदींनी परिश्रम घेतले.

नवरात्रोत्सव २०२३ रंगशक्ती

● अनमाने परिवार व महिला मंडळ, मु. मुनवली, ता. अलिबाग (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)

● इशानी सतीश भिंगे, मु. बांधण, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड. (छायाचित्र : जीवन पाटील)



● कु. ईश्वरी सुशांत घोडेकर, मु. गोंधळपाडा, पो. वेश्री, ता. अलिबाग, जि. रायगड.

बकऱ्यांच्या गोठ्याचा त्रास

। पेण । प्रतिनिधी ।

मोहल्ल्यात भर वस्तीमध्ये बकरीच्या गोठ्याच्या दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पेण नगरपालिका याकडे दुर्लक्ष करत आहे. महत्वाची बाब म्हणजे हा गोठा पेण नगरपालिकेतील एका लोकप्रतिनिधीच्या भावाचा असल्याचे बोलले जाते. त्यामुळे नागरिक देखील तक्रार करायला घाबरत आहेत.

खाटीक मोहल्ल्यात प्रत्यश भेट दिली असता गोठ्याच्या बाजुने चालत जाणे कठीण होते. दुर्गंधी एवढ्या मोठ्या प्रमाणात आहे, की शेजाराच्या घरांना देखील त्याचा त्रास होत आहे. रस्त्यावरुन जाणाऱ्या वाटसरुंना नाकाला रुमाल लावल्याशिवाय जात येत नाही. समोर लोखंडी ग्रीलचा दरवाजा असून त्याला हिरव्या रंगाची जाळी लावले आहे. तसेच आतील बाजूला बकऱ्या दिसू नयेत म्हणून शर्टर लावण्यात आले आहे. जेणेकरुन सर्वसामान्य नागरिकांना हा गोठा आहे, असे समजू नये. याबाबत पेण नगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे अधिकारी शिवाजी चव्हाण यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, सदरील सत्यता काय आहे. ती मी पडताळून घेतो. जर गोठा असेल, तर मालकाविरुध्द तातडीने कारवाई करतो.

स्त्रीशक्तीच्या जयघोषाने दुर्गामाता दौडला प्रारंभ

। महाड । वार्ताहर ।

रविवार १५ ऑक्टोबर या घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर महाडमध्ये श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान आयोजित दुर्गामाता दौड उपक्रमास मोठ्या उत्साहात सुरुवात करण्यात आली.

सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौकातून छत्रपतींना वंदन करून या दुर्गामाता दौडला सुरुवात करण्यात आली. शंखनाद, संबळच्या साथीने देवीमातेचा, प्रभू श्रीरामांचा जयघोष करीत शहरातील काही शक्तीस्थानांचे दर्शन करून पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज चौकात या दौडच्या पहिल्या दिवसाची सांगता करण्यात आली. याप्रसंगी शिवप्रतिष्ठान तर्फे सिद्धेश मोरे अक्षय दळवी यांच्यासह मोठ्या संख्येने युवक-युवती आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

आई आंबेमातेचे उत्साहात आगमन

तळा तालुक्यात २८ देवींच्या मूर्तींची प्रतिष्ठापना

। तळा । वार्ताहर ।

रविवारी घटस्थापनेला तालुक्यात २३ सार्वजनिक व ५ खाजगी अशा एकूण २८ देवींच्या मूर्तीची प्रतिष्ठापना तर ४ ठिकाणी घट व दोन ठिकाणी देवीच्या प्रतिमेची स्थापना करण्यात आली. जल्लोषात सर्वत्र देवीचे आगमन झाले. नवरात्रौसवाचे मुख्य आकर्षण असलेल्या गरबा रास खेळण्यासाठी तरुणाईमध्ये उत्साह संचारला आहे. याहीवर्षी तालुक्यात मोठ्या उत्साहात नवरात्रोत्सव साजरा होणार असून मराठी, गुजराती, हिंदी गाण्यांच्या तालावर तरुणाईकडून गरब्याचा आनंद लुटला जाणार आहे. यांसह यावर्षी मंडळांकडून विविध सांस्कृतिक कार्यक्रम देखील आयोजित करण्यात येणार असून नऊ दिवस देवीची आरती, उपवास, महाप्रसाद, भंडारा, भजन यांसारखे धार्मिक कार्यक्रम देखील पार पडणार आहेत.

● सौ.तेजस्वी संकेत घरत. रा.लोणारे (घरत आळी) पो थळ अलिबाग.

चोराला पकडले

अलिबाग : शहरातील जामा मस्जिदमध्ये शिरून तेथील दानपेटी चोरी केल्याची घटना गुरुवारी घडली होती. सदर चोराला तळोजा येथील मशिदीत चोरी करण्याचा प्रयत्न करत असताना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यानंतर त्याला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आल.अब्दुल्ला अकबर असे या चोरट्याचे नाव आहे.

मुख्य बाजारपेठेत मुस्लिम समाजाचे प्रार्थना स्थळ आहे. चोरटयाने आत शिरून तेथे असलेली दानपेटी उचलून पोबारा केला होता. सदर घटना सीसीटिव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली होती. याच चोरट्याने पेण येथील मशिदीमध्ये देखील चोरी केली. तो पुढे पनवेल परिसरात मशिदीत चोरी करणार असल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला होता.

वडखळ ग्रामपंचायतीकडे तालुक्याचे लक्ष

। पेण । प्रतिनिधी ।

जिल्ह्यात ग्रामपंचायतींच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. पेण तालुक्यातील ११ ग्रामपंचायतींपैकी वडखळ ग्रामपंचायतीची निवडणूक प्रतिष्ठेची मानली जात आहे. त्यामुळे अवघ्या तालुक्याचे लक्ष लागले आहे.

वडखळ ग्रामपंचायतीमध्ये गेल्या पाच वर्षात सत्तासंघर्ष शिगेला पोहोचला होता. भ्रष्टाचाराच्या आरोपावरून सरपंच राजेश मोकल यांना पायउतार व्हावे लागले होते. तसेच सरपंचपद वाचवण्यासाठी मोकल यांना विविध राजकीय पक्षांची वारी करावी लागली होती. सदस्यांच्या अविश्वासाच्या ठरावामुळे मोकल यांचा पराभव झाला.

गेल्या पाच वर्षात ग्रामपंचायतीमधील विविध भानगडी पेणकरांना पहायला मिळाल्या. एकूणच मोकल विरुध्द निवडून आलेले काही सदस्य यांचा सामना रंगला. शेवटी मोकल यांच्यावर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमानुसार कारवाई झाली. त्यांना सरपंचपद सोडावे लागलेच. शिवाय, पुढे निवडणूक लढवण्यास मज्जाव केला गेला. राजेश मोकल यांनी याबाबत उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. परंतु, उच्च न्यायालयात अजून सुनावणी झालेली नाही. त्यातच मोकल यांनी एमआयडीसी व्हावी म्हणून शेतकऱ्यांच्या विरोधात प्रसारमाध्यमांना माहिती दिली. शेतकऱ्यांच्या बाजूने लढणारे शेकापचे नेते आमदार जयंत पाटील यांच्याबाबत अपशब्द काढले होते. ५ नोव्हेंबरला पार पडणाऱ्या निवडणुकीवर याचा परिणाम पहायला मिळणार आहे. मोकल यांनी आपल्या पत्नीला थेट सरपंचाचे उमेदवार म्हणून घोषित करून निवडणूक रिंगणात उतरवले आहे. त्यातच मोकल यांच्या राजकीय वाऱ्या पाहता काँग्रेस, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसमधील वरिष्ठ नेत्यांचा विश्वास मोकल यांनी गमवला असल्याचे चित्र आहे. भाजप प्रवेशाला स्थानिक आमदार रविंद्र पाटील यांनी विरोध केला होता. आमदार पाटील यांच्या मनधरणीनंतर मोकल यांचा पक्षप्रवेश सुकर झाल्याचे त्यावेळी बोलले जात होते.

मोकल यांच्याविरुध्द प्रभाकर म्हात्रे, योगेश पाटील, मिलिंद मोकल, सुनिल जांभळे, रवि म्हात्रे, निलेश म्हात्रे यांनी दंड थोपटले आहेत. यामध्ये निलेश म्हात्रे हे जरी काँग्रेसचे असले, तरी त्यांनी एमआयडीसी विरुध्द मोठा लढा उभारला आहे. तसेच ते आमदार जयंत पाटील यांचे विश्वासू आणि निकटवर्तीय आहेत. योगेश पाटील आणि प्रभाकर म्हात्रे हे आमदार रविंद्र पाटील यांचे जवळचे आहेत.

तसेच मिलिंद मोकल हे शिवसेना ठाकरे गटाचे असून ते उध्दव ठाकरे यांच्या विश्वासातले आहेत. एकंदरीत मोकल यांना चारही बाजूने घेरण्यासाठी सर्वजण सज्ज झाले आहेत. त्यांनी श्री क्षेत्रेश्वर जनमत विकास आघाडीची स्थापना केली आहे, तर मोकल यांनी श्री क्षेत्रेश्वर विकास आघाडी निर्माण करून निवडणूक लढवण्याचे ठरविले आहे. या वडखळ ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये साम-दाम-दंड-भेद या नीतीचे अवलंब दोन्ही बाजूंनी आपल्याला पहायला मिळणार हे नक्की.

स्वामी समर्थ वाचनालयात वाचक दिन

। अलिबाग । वार्ताहर ।

चेंढरे येथील स्वामी समर्थ वाचनालयात नुकताच वाचक प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्त्या श्रृती राजे आणि संस्थेच्या खजिनदार जया रानडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला. राजे यांनी यावेळी कविता अशी घडते या विषयावर व्याख्यान दिले. यामधून त्यांनी मान्यवरांच्या कवितांचा संदर्भ देत उपस्थितांना माहिती दिली. जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार, ग्रंथपाल भालचंद्र वर्तक यांनीही सदिच्छा भेट दिली. ग्रंथालयाचे अध्यक्ष दीपक कुलकर्णी यांनी त्यांचे स्वागत केले. जया रानडे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला प्रभूसिंग लिगाडे, डॉ.धाट, दाते, प्रज्ञा जोशी, ॲड.स्वाती कुलकर्णी, साधना भगत, माधवी खराडे यांच्यासह महिला उपस्थित होत्या. ग्रंथपाल दीप्ती कुलकर्णी, यावडकर यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

राष्ट्रीय महिला किसान दिनी

वनहक्कधारकांनी वेधले लक्ष

। पेण । वार्ताहर ।

महिला शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्रालयाने १५ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय महिला शेतकरी दिन म्हणून साजरा करायचे ठरवले आहे. या निमित्ताने महिला किसान अधिकार मंच या राष्ट्रीय मंचामार्फत अभियान राबविण्यात येत आहे.

पेण तालुक्यातील जुलै महिन्यातील दरडग्रस्त, अतिवृष्टीत वनहक्क मान्यताप्राप्त जमीनीवर झालेल्या नुकसानाबाबत आदिवासी शेतकरी महिलांनी शासनाचे लक्ष वेधून स्वाक्षरी अभियान सुरू केले आहे. अशी माहिती डॉ. वैशाली पाटील यांनी दिली.

१५ ऑक्टोबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिवस' म्हणून साजरा करण्यासंबंधीचा ठराव २००७ साली संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने संमत केला. आपल्या देशात हा दिवस 'राष्ट्रीय महिला शेतकरी दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिन साजरा करताना आपल्याकडे कर्तबगार ग्रामीण स्त्रियांचा सत्कार वगैरे कार्यक्रमांचे आयोजन होते खरे, मात्र त्यापलीकडे पोहोचत महिला शेतकऱ्यांच्या सबलीकरणासाठी पुरेशी पावले धोरण स्तरावर उचलली जाणे अत्यावश्यक आहे, असे वैशाली पाटील यांनी सांगितले.

दुर्देवाने वनहक्क मान्यताप्राप्त जमीनधारक आदिवासी शेतकरी महिलांना अद्याप सातबारा देण्यास सरकार अपयशी ठरल्यामुळे नुकसान भरपाई मिळालेली नाही. याबाबत महिला किसान दिनी स्वाक्षरी अभियान राबविण्यात येत आहे. सोमवारी याचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात येणार असल्याची माहिती अंकुर ट्रस्टचे निवळकर व सावंत यांनी दिली.

वाचनसंस्कृती टिकविण्यासाठी उपक्रम

पुस्तके भेट देण्याचा प्रघात वाढला

। पाली/गोमाशी । वार्ताहर ।

आधुनिक युगात ज्ञानाची कवाडे वेगवेगळ्या माध्यमातून खुली झाली आहेत. मात्र अनेक अडथळे व संसाधनांचा अभावामुळे ती सर्वांपर्यंत पोहचत नाहीत. पण ज्ञानसागराने भरलेल्या, सहज कोठेही उपलब्ध होऊ शकणाऱ्या पुस्तकांना स्थळ काळाचे बंधन नाही. प्रत्येकाच्या आयुष्यात पुस्तकाचे महत्व अनन्यसाधारण आहे. म्हणूनच वाचनसंस्कृती टिकावी, ज्ञानाची कवाडे आणखी विस्तारावीत व सर्वांपर्यंत पुस्तके सहज पोहचावी यासाठी वाढदिवस, समारंभ, कार्यक्रम आदी ठिकाणी फुल, पुष्पगुच्छ याऐवजी पुस्तके भेट देण्याचे प्रमाण वाढताना दिसत आहे.

हार, फुले, पुष्पगुच्छ कालांतराने सुकून जातात. मात्र त्या ऐवजी पुस्तके दिल्यास ती इतरांचे आयुष्य आनंदाने फुलवून टाकतात. त्यांचे विचार समृद्ध करतात. सुधागड तालुक्यातील प्रसिद्ध कवी व साहित्यिक उमेश जाधव यांनी सांगितले की, लोक पुस्तक वाचनाकडे वळत आहेत. वाचनासाठी खास वेळ देखील काढत आहेत. चांगल्या पुस्तकाची चिकित्सा करुन आपले मतही मांडत आहेत. गाव खेड्यात देखील वाचन संस्कृती बहरत आहे. कोणत्याही कार्यक्रमास गेल्यास लोक आवर्जून पुस्तक देतात. मीही अनेकांना माझा कविता संग्रह भेट देतो असे उमेश म्हणाले.

केतन म्हसके यांनी सांगितले की, खेड्यापाड्यातील विद्यार्थी व तरुण यांना वाचनाची सवय लागावी. तसेच त्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवावे, अवांतर पुस्तक वाचनाकडे त्यांनी वळावे. यासाठी संस्थेच्या, शासनाच्या तसेच दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून गावागावांमध्ये ग्रंथालय उभारण्याचे काम सुरू आहे. यामुळे गावागावांत वाचन संस्कृती वृद्धिंगत होत आहे.

> गेल्या अनेक वर्षापासून वाढदिवसानिमित्त, पाहुण्याच्या स्वागतावेळी किंवा विशेष कार्यक्रमावेळी पुस्तके भेट देत आहे. समोरून मला सुद्धा पुस्तके भेट मिळतात. पुस्तके वाचली पाहिजेत. जसा वेळ मिळेल तसे वाचत राहिले पाहिजे.
>
> -सागर शिंदे, प्राथमिक शिक्षक, राजीप वन्हाड शाळा

पालीतील शिक्षक मोरेश्वर कांबळे यांनी सांगितले की, वाढदिवस, समारंभ, कार्यक्रम व स्नेहसंमेलन अशा विविध ठिकाणी पुस्तके देण्याचा प्रघात वाढताना दिसत आहे. शिवाय अनेक लोक व संस्था शाळांना अवांतर वाचनाची पुस्तके भेट देतात. ही बाब निश्चित स्वागतार्ह आहे. यातून समाज अधिक सजग व प्रगतिशील होण्यास गती मिळेल.

जरांगेअण्णा, सबुरीने

सुमारे बारा वर्षांपूर्वी म्हणजे एप्रिल २०११ मध्ये अण्णा हजारे यांनी लोकपाल आणण्याच्या मागणीसाठी दिल्लीत जंतर मंतरवर उपोषण केले. त्याला प्रचंड प्रसिद्धी मिळाली. लोकपाल हा सर्व भ्रष्टाचारांवरचा एकच इलाज असल्याचा दावा करण्यात येऊ लागला. या लोकपालाची निवड आणि नेमणूक कोण करणार आणि त्यानेच भ्रष्टाचार केला तर काय करणार अशा प्रश्नांना अण्णांकडे उत्तरे नव्हती. पण तेव्हा त्यांचे भक्त बेभान झाले होते. मनमोहनसिंग सरकारला बदनाम करण्यासाठी भाजपने या आंदोलनाचा वापर करून घेतला. आज अण्णा हजारे यांच्या पत्राला पंतप्रधान कार्यालय साधी पोचदेखील देत नाही. लोकपाल हा शब्ददेखील गेल्या दहा वर्षात कोणी काढलेला नाही. खुद्द अण्णा एकदम निद्रितावस्थेत आहेत. आता महाराष्ट्रात मनोज जरांगे यांच्या रुपाने नवा अण्णा अवतरला आहे. मराठ्यांना आरक्षण मिळालंच पाहिजे ही त्यांची एकमेव घोषणा आणि तोच एककलमी कार्यक्रम आहे. अण्णांच्याच पध्दतीने जरांगे यांनी गेल्या महिन्यात यासाठी पहिले उपोषण केले. ते सोडवायला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे धावून गेले. त्यावेळी जरांगे यांनी सरकारला चाळीस दिवसांची मुदत दिली. ती २४ ऑक्टोबरला संपेल. त्यापूर्वी इशारा देण्यासाठी शनिवारी जालना जिल्ह्यात गाजावाजा करून सभा भरण्यात आली. तिला प्रचंड गर्दी झाली. अर्थात यापूर्वी याच प्रश्नावर निघालेले विराट मोर्चे पाहता हे चित्र अगदीच अनपेक्षित नव्हते. राज्यातील सर्व मराठ्यांना कुणबी म्हणून दाखले द्या आणि मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण द्या, यासाठी नेमलेली समिती गुंडाळून ठेवा, नियम-कायद्यांचे आम्हाला सांगू नका अशी एकूण जरांगे यांची भूमिका आहे. हे न झाल्यास आपण अंतिम उपोषण करून मरणाला सामोरे जाऊ असा इशाराही त्यांनी दिला. जनतेला अशी तडकफडक भाषा नेहमीच आवडते आणि ती बोलणाऱ्यांना लोक हिरो करतात. जरांगेअण्णा सध्या अशाच लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ आहेत. पण या लाटेचे भवितव्य काय हा प्रश्न आहे.

आंदोलनामागचे राजकारण

मराठा आरक्षणाचा मुद्दा गुंतागुंतीचा आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये त्यावर काढलेल्या सरकारी निर्णयाचे व कायद्याचे तोडगे न्यायालयात फेटाळले गेले आहेत. दुसरीकडे आरक्षणावरची पन्नास टक्क्यांची मर्यादा वाढवण्याबाबत केंद्र सरकार गप्प आहे. तसे करणे म्हणजे समस्यांचा नवीन पेटारा खोलण्यासारखे आहे हेही खरे आहे. मात्र जरांगे यांच्यासारखे नेते ही गुंतागुंत समजून न घेता वा तिच्याकडे दुर्लक्ष करून आम्हाला आरक्षण हवेच असा हेका धरत आहेत. तसे करणे म्हणजे जनतेच्या भावना भडकावणे आहे. जरांगे यांनी पुन्हा उपोषणाचा व राज्यभर आंदोलनांचा इशारा दिला आहे. यात लाखो तरुण स्वाभाविकपणे ओढले जाणार आहेत. त्यातच ओबीसीमधून आरक्षण मिळावे ही मागणी जरांगे यांनी ठळकपणे पुढे आणली आहे. आजवरच्या मराठा मोर्चांमध्ये त्यावर मौन बाळगलेले होते. त्यामुळे विविध ओबीसी गट आणि मराठा समाज हे आमनेसामने येण्याचा धोका निर्माण झाला आहे. जरांगे यांना प्रत्युत्तर म्हणून ओबीसी नेत्यांनी यापूर्वीच उपोषण करून झाले आहे. शनिवारच्या भाषणात जरांगे यांनी थेट छगन भुजबळ यांच्यावर नाव घेऊन हल्ला केला. ते पाहता आता ओबीसींकडूनही प्रतिआंदोलन सुरू होईल. यामुळे राज्यात अशांतता निर्माण होऊ शकते. महाराष्ट्राची सामाजिक वीण विस्कटणाऱ्या या संभाव्य आंदोलनांना त्यांच्या नेत्यांनी वेळीच आवर घालायला हवा. शनिवारच्या सभेत जरांगे यांनी सत्तेतील अजितदादा गट व देवेंद्र फडणवीस या दोघांवरही नाव घेऊन टीका केली. आपल्या आंदोलनात फूट पाडण्याचा व हिंसाचार माजवण्याचा कट रचला जात असल्याचा आरोप केला. मुख्यमंत्र्यांबाबत मात्र ते काहीही बोलले नाहीत. यामुळे शिंदे गट सत्तेतील इतर दोन पक्षांना नियंत्रणात ठेवण्यासाठी जरांगे यांना वापरून घेतो आहे काय असा प्रश्न निर्माण होणे साहजिक आहे. आपले राजकारण साधण्यासाठी खरेच असे काही चालू असेल तर त्यातून महाराष्ट्राचे नुकसानच होत आहे हे लक्षात ठेवायला हवे.

तरुणांच्या उद्रेकाचा धोका

एक काळ असा होता की आरक्षण किंवा राखीव जागा याकडे बहुसंख्य समाज रागाने पाहात असे. १९९० मध्ये मंडल आयोगाविरुद्ध काही तरुणांनी आत्मदहन केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित संघटना तेव्हा अप्रत्यक्षपणे या तरुणांना पाठिंबा देत होत्या. आता देवेंद्र फडणवीस ठाकरे गटावर टीका करीत आहेत की त्यांचा आरक्षणाला विरोध होता. बाळासाहेब ठाकरे यांचा मंडल आयोगाला विरोध होता हे खरे आहे. त्याचेच निमित्त होऊन छगन भुजबळ काँग्रेसमध्ये दाखल झाले. पण तेव्हा भाजपचीही भूमिकाही बोटचेपीच होती. मंडल आयोग लागू होण्याचा सर्वाधिक फायदा नंतर भाजपनेच उठवला. पुढे हे आरक्षणाचे लोण कथित वरिष्ठ जातीत पसरले त्याचाही फायदा घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. गुजरातेत पटेल आरक्षणाचा मुद्दा असाच पेटला होता. त्या लाटेवर हार्दिक पटेल हा ऐन पंचविशीतला कार्यकर्ता हिरो बनला. सर्व पक्षांमधील पटेलांनी त्याला पाठिंबा दिला. तो नरेंद्र मोदींना आव्हान देऊ लागला. काही काळ काँग्रेसमध्ये घालवून तो अंतिमतः भाजपत जाऊन विसावला आहे. मराठा आरक्षणासाठी जी आंदोलने झाली त्यालाही भाजपसह सर्व पक्षांनी असेच वापरून घेतले. मात्र यामुळे आरक्षण हेच आपल्या समस्यांचे समाधान आहे असा भाबडा समज करून घेऊन रस्त्यावर लढणाऱ्या तरुणांची आयुष्ये बरबाद झाली. त्यापूर्वी अण्णा हजारे यांच्या आंदोलनात वाहवत गेलेल्या ध्येयवादी तरुणांचीही अशीच काहीशी वाताहात झाली. योगेंद्र यादव यांच्यासारखे भलेभले लोकही याला भुलले हे लक्षात घेता सामान्य तरुणांना दोष देता येत नाही. जरांगेअण्णांचे आंदोलन याच मार्गाने जाण्याचा पुरेपूर धोका आहे. वेळीच तो ओळखून सर्वपक्षीय नेत्यांनी हा प्रकार रोखायला हवा. या पक्षांच्या राजकीय फायद्यापेक्षा सामान्य तरुणांची आयुष्ये अधिक महत्वाची आहेत. शिवाय, वारंवार अपेक्षा उंचावून त्या पूर्ण झाल्या नाहीत तर त्यामुळे या तरुणांच्या उद्रेकाचा मोठा भडका उडू शकतो व तो भयंकर असेल.

विचार

श्रीमंत वाढले, पण रोजगार घटले

महेश देशपांडे

भारतीय अर्थव्यवस्थेच्या बाबतीत सातत्याने उलटसुलट बातम्या ऐकायला मिळत असतात. या पार्श्वभूमीवर देशात श्रीमंतांची संख्या वाढत असल्याची बातमी एका बाजुला प्रगतीची पावले दाखवते, पण दुसऱ्याच बाजुला रोजगार मिळत नसल्याने लोक मनरेगाच्या कामांकडे वळत असून त्यामुळे ही कामे अधिक प्रमाणात वाढवावी लागत असल्याची बातमी समोर येते. अर्थात तंत्रस्नेही विकासाचा प्रत्यय अनेक क्षेत्रांमध्ये येत आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या बाबतीत सातत्याने उलटसुलट बातम्या ऐकायला मिळत असतात. कधी आपल्या विकासाचा दर प्रतिकूल परिस्थितीतही वाढत असतो तर कधी देशाला मंदीचा फटका बसण्याची शक्यता असल्याची बातमी येते. देशाच्या दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत तर सतत मतमतांतरे ऐकायला मिळत असतात. या पार्श्वभूमीवर देशात श्रीमंतांची संख्या वाढत असल्याची बातमी एका बाजुला प्रगतीची पावले दाखवते, पण दुसऱ्याच बाजुला रोजगार मिळत नसल्याने लोक मनरेगाच्या कामांकडे वळत असून त्यामुळे ही कामे अधिक प्रमाणात वाढवावी लागत असल्याची बातमी समोर येते. दरम्यान, बँकेत न जाताही पैसे भरता-काढता येण्याचे तंत्र स्टेट बँक ऑफ इंडिया राबवत असल्याची बातमी आपली तांत्रिक सिध्दता दाखवून देते तर आयडिया वोडाफोन कंपनी आर्थिक अडचणीत आल्याचा सांगावाही याच सुमारास पुढे येतो. देशातील श्रीमंत लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये देशात वर्षाला पाच लाख रुपयांपेक्षा अधिक पैसे कमवणाऱ्यांच्या संख्येत पाचपटीने वाढ झाल्याची माहिती एका अहवालातून समोर आली आहे. देशातील लोकांच्या उत्पन्नातही वाढ होताना दिसत आहे. सध्या एक कोटी ऐंशी लाख लोक वर्षाला पाच लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न मिळवतात. आयटी विभागाच्या डेटाचे विश्लेषण केले आहे. त्यानुसार २०१२-१३ या आर्थिक वर्षात वार्षिक पाच लाख रुपये कमावणाऱ्या लोकांची संख्या ३८ लाख इतकी होती; मात्र २०२१-२२ मध्ये त्यात पाचपटीने वाढ झाली आहे. गेल्या दशकभरात लोकांचे उत्पन्न वाढले असून कर्ज फेडण्याची क्षमताही वाढली आहे. याशिवाय उपभोग आणि गुंतवणुकीच्या पातळीवरही सुधारणा दिसून आली आहे. आयटी विभागाने २०२१ पर्यंतचा डेटा दिला आहे; मात्र आजघडीला हे आकडे त्याहूनही जास्त असू शकतात, असा विश्वास अहवालात व्यक्त करण्यात आला आहे.

कोरोना महामारीच्या काळात लोकांच्या उत्पन्नात घट झाली होती; परंतु त्यानंतरच्या काळात अनेक लोकांच्या उत्पन्नात पाचपट वाढ झाली आहे. आयटी सेवा आणि वित्तीय सेवांसह सेवा क्षेत्राच्या ताकदीमुळे भारतातील उच्च-उत्पन्न कुटुंबांचे प्रमाण गेल्या दशकात वाढले आहे. अहवालानुसार, भारतात श्रीमंत कुटुंबांची संख्या झपाट्याने वाढत आहे. अहवालात दिसून आले आहे की वाढत्या उत्पन्नामुळे ऑटोमोबाईल, वित्तीय सेवा, दागिने, हॉटेल्स, रिअल इस्टेट, सिगारेट, मल्टिप्लेक्स आणि रुग्णालये यासारख्या क्षेत्रांचा महसूल वेगाने वाढत आहे. त्याच वेळी, या क्षेत्रांशी संबंधित कंपन्यांच्या वापरातही वाढ दिसून येत आहे. पाच ते दहा लाख रुपये, दहा ते वीस लाख आणि वीस ते पन्नास लाख रुपये पगार असलेल्या करदात्यांची संख्या आर्थिक वर्ष २०१२-२१ दरम्यान अनुक्रमे १७.६ टक्के, २०.८ टक्के आणि २१.६ टक्क्यांनी वाढली आहे. पाच लाखांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या व्यक्तींची संख्या २०२१ मध्ये ७२.२ टक्क्यांवर आली आहे. ती आर्थिक वर्ष २०१२ मध्ये ८६.८ टक्के होती.

याच सुमारास समोर आलेली मनरेगा संदर्भातील एक बातमी कोड्यात पाडून जाते. सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या मनरेगा या प्रमुख ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रोजगार शोधणाऱ्या लोकांच्या संख्येत वाढ झाली आहे. अहवालानुसार २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीमध्ये मनरेगा अंतर्गत कामाच्या मागणीत वाढ झाली आहे. अशा स्थितीत आगामी काळात औद्योगिक सुधारणा होण्याच्या आशांना मोठा धक्का बसला असून देशातील रोजगाराबाबत चिंता वाढली आहे. 'मनरेगा'साठी या आर्थिक वर्षात निश्चित केलेल्या बजेटपैकी ९३ टक्के रक्कम खर्च झाली आहे. अशा परिस्थितीत आगामी काळात या आर्थिक वर्षात ही योजना पुढे चालवण्यासाठी सरकारकडे पुरेसा निधी नसू शकतो. त्यामुळे या योजनेचे बजेट वाढवावे लागेल. या आर्थिक वर्षात सरकारने मनरेगा अंतर्गत साठ हजार कोटी रुपयांचे बजेट दिले होते. तज्ज्ञांच्या मते २०२३-२४ या आर्थिक वर्षात ग्रामीण भागात मनरेगाची वाढती मागणी हे अर्थव्यवस्थेसाठी वाईट लक्षण आहे. खेड्यापाड्यात मनरेगा अंतर्गत काम मागणाऱ्यांची संख्या वाढल्याने शहरातील मजुरांची मागणी कमी झाल्याचे दिसून येते. सामान्यतः ग्रामीण भागातील मजूर शहरांमधील कारखान्यांमध्ये काम करतात. अशा परिस्थितीत हे आकडे दर्शवतात की गेल्या सहा महिन्यांमध्ये कारखान्यांमधील काम मंदावले आहे. ते अर्थव्यवस्थेसाठी चांगले लक्षण नाही. यासोबतच यंदा मॉन्सूनमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने कृषी क्षेत्रातील मजुरांची मागणीही कमी झाली आहे.

दरम्यान, स्टेट बँकेच्या खातेदारांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. कारण आता छोट्या कामांसाठी बँकेत जावे लागणार नाही. स्टेट बँकेच्या ग्राहक सेवा केंद्राचे एजंट घरी येतील आणि समस्या सोडवतील. स्टेट बँकेने आपल्या ग्राहकांसाठी 'कियॉस्क बँकिंग' सुरू करण्याची योजना आखली आहे. म्हणजेच आता पैसे काढण्यासाठी आणि जमा करण्यासाठी बँकेत जावे लागणार नाही, तर ग्राहक सेवा केंद्राचे एजंट बँकिंग सेवा देण्यासाठी घरी येतील. वृद्ध आणि दिव्यांगांना याचा मोठा फायदा होणार आहे. 'कियॉस्क बँकिंग' सुविधेचा वृद्ध आणि दिव्यांगांना मोठा फायदा होणार आहे. स्टेट बँकेचे अध्यक्ष दिनेश खारा यांनी दिलेल्या माहितीनुसार या उपक्रमाचा उद्देश आर्थिक समावेश अधिक मजबूत आणि सुलभ करणे हा आहे. जेणेकरून, बँकिंग सेवा सामान्य लोकांच्या घरापर्यंत पोहोचवता येतील. त्यामुळे सहाजिकच दिव्यांग, वृद्ध आणि आजारी व्यक्तींना बँकेत यावे लागणार नाही.

या नवीन उपक्रमांतर्गत सुरुवातीला स्टेट बँकेने पाच बँकिंग सेवा सुरू केल्या आहेत. म्हणजेच ग्राहकांना आता घरबसल्या पैसे काढणे, पैसे जमा करणे, मनी ट्रान्सफर, बॅलन्स तपासणे आणि मिनी स्टेटमेंट या सुविधांचा लाभ घेता येणार आहे. विशेष बाब म्हणजे बँकेच्या ग्राहक सेवा केंद्रांवर होणाऱ्या एकूण व्यवहारांपैकी या सेवांचा वाटा ७५ टक्क्यांहून अधिक आहे. खारा यांच्या म्हणण्यानुसार बँक आपल्या सेवांचा अधिक विस्तार करेल. ग्राहकांना सामाजिक सुरक्षा योजनांतर्गत नावनोंदणी, खाते उघडणे आणि कार्ड आधारित सेवादेखील मिळतील.

आता एक बातमी टेलिकॉम सेक्टरमधल्या चिंतेची. व्होडाफोन आयडियाच्या ग्राहकांना येत्या काही दिवसांमध्ये नेटवर्कच्या समस्यांना सामोरे जावे लागू शकते. कारण 'इंडस टॉवर्स' ही टॉवर उभारणी करणारी कंपनी या कंपनीला पाठिंबा देणे बंद करू शकते. व्होडाफोन आणि 'आयडिया'ने अद्याप कर्जाच्या थकबाकीची परतफेड केलेली नाही. अशा परिस्थितीत व्होडाफोन आयडियाच्या काही सेवा बंद कराव्या लागतील. आपली थकबाकी वसूल करण्यासाठी कायदेशीर मार्गाचा अवलंब करावा लागेल, अशी माहितीही 'इंडस टॉवर्स'ने दिली आहे. 'इंडस टॉवर्स'ने वोडाफोन आणि आयडिया देय रक्कम देण्यास जाणीवपूर्वक विलंब करत असल्याचा आरोप केला आहे. त्यांच्या मते, थकबाकी भरण्यास विलंब होत असल्याने कंपनीच्या कारभारावर परिणाम होत आहे. यामुळे कंपनीला आर्थिक आव्हानांचाही सामना करावा लागत आहे. व्होडाफोन आयडिया 'इंडस टॉवर्स'ला व्याजासह ७,८६४.५ कोटी रुपये देणे लागतात; मात्र कंपनीकडून पैसे अदा करण्यास सातत्याने विलंब होत आहे. यामुळे व्होडाफोन आणि 'आयडिया'ला नेटवर्क सपोर्ट देणे बंद होऊ शकते. पेमेंट न केल्यास इंडस टॉवर्स कंपनी कोर्टातही जाऊ शकते. याशिवाय, ते 'व्होडाफोन आयडिया'ला दूरसंचार सेवा देणे देखील बंद करू शकतात, जेणेकरून आणखी तोटा सहन करावा लागणार नाही. दरम्यान, कंपनीने असा निर्णय घेतल्यास लोकांच्या मोबाईलमध्ये नेटवर्कची समस्या निर्माण होईल. 'व्होडाफोन आयडिया'चे भारतात २२ कोटींहून अधिक वापरकर्ते आहेत. कंपनीने थकबाकी न भरल्यास सर्वसामान्यांनाही अडचणींचा सामना करावा लागणार आहे. इंडस टॉवर्स ही कंपनी 'व्होडाफोन आयडिया'सह इतर टेलिकॉम ऑपरेटर्सना पायाभूत सुविधा पुरवते. त्याच्या मदतीने दूरसंचार कंपन्या देशभरातील ग्राहकांना नेटवर्क सेवा प्रदान करतात. दीर्घ कालावधीपर्यंत अशीच स्थिती राहिली, तर 'इंडस टॉवर'चे अन्य ग्राहकही पेमेंटमध्ये उशिर किंवा सूट देण्याची मागणी करतील. यामुळे संपूर्ण टेलिकॉम इन्फ्रास्ट्रक्चरवरील जोखीम वाढेल. टेलिकॉम सेवांच्या दर्जावरही याचा परिणाम होईल. २९ सप्टेंबर रोजी 'व्होडाफोन आयडिया'ने ट्रायला एक पत्र लिहिले होते. त्यात थकबाकी अदा करण्यासाठी सातत्याने समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे कंपनीने म्हटले.

आजकाल

या शस्त्रास्त्रांचा खर्च करते कोण

संजीव चांदोरकर

रशिया-युक्रेन गेले दीड वर्षे सुरु असणारे युद्ध असुदे कि आता हमास इस्रायल किंवा पूर्वीचे इराण इराक, किंवा अफगाणिस्तान किंवा आफ्रिकेतील इथियोपिया -इरिट्रिया किंवा टोळीयुद्ध यांच्या चित्रफिती टीव्हीवर बघताना एकच गोष्ट डोक्यात घोळत असते.

आजच्या युगातील हि अत्याधुनिक शस्त्रात्रे बनवायला किती प्रचंड खर्च येत असला पाहिजे; शस्त्रांचे उत्पादन, त्याची वाहतूक, नुसती शस्त्रे नाहीत तर त्यांची देखभाल, ती हाताळणाऱ्या लोकांना प्रशिक्षण कोठून येत असेल यासाठी लागणारे लाखो कोटी रुपयांचे भांडवल.

कोणत्या स्रोतातून हे खर्च भागवले जात असतील? सरकारच्या/देशाच्या शास्त्र भांडारात ही शस्त्रे जातात त्यावेळी अर्थातच सरकारी तिजोरीतून त्याचा खर्च भागतो.

पण बिगर शासकीय (नॉन स्टेट) शस्त्रे बाळगणारे/वापरणारे अक्षरशः शेकडो सशस्त्र गट/संघटना/पक्ष सर्वच भूभागात आहेत; ती लोक काही स्वतः करवती/हातोडा/स्क्रू ड्रॉयव्हर घेऊन ती शस्त्रे बनवत नाहीत, म्हणजे विकत घेतात, म्हणजे पैसे मोजतात, म्हणजे मग पैसे उभे करणे आले.

२०२२ सालात जगातील फक्त शासनांनी २२०० बिलियन्स डॉलर्स शास्त्रास्त्रांवर खर्च केले;

म्हणजे भारताच्या २०२२-२३ वार्षिक ४५ लाख कोटींच्या अर्थसंकल्पाच्या चार पट; किंवा युनोची विकास संस्था असणाऱ्या च्या २०२२ च्या वार्षिक बजेटच्या ३५ पट सर्व देशांमध्ये काही शेकडो कोटी कुटुंबाना पिण्याचे पाणी घरात मिळत नाही; त्या सर्वांना लागणाऱ्या पाणी पुरवठा योजना वरील खर्चात १०० वेळा राबवता येतील.

हे झाले शासनांनी केलेले खर्च;

नॉन स्टेट ऍक्टर्सनी/किती तरी दहशतवादी संघटनांनी/आफ्रिकेतील टोळ्यांनी शस्त्रास्त्रे जमवण्यावर केलेले खर्च वेगळे.

शिवाय भारतासकट प्रत्येक देशात तलवारी / कोयते / चॉपर / गावठी बंदुका / कट्टे यांचे विकेंद्रित उत्पादन गेली शेकडो वर्षे सुरूच आहे ; त्याचे ना रेकॉर्ड ना कर आकारणी; तो उद्योग असाच प्रचंड आहे.

आणि हे फक्त २०२२ सालातील १२ महिन्यात केलेले खर्च; दरवर्षी अशाच प्रमाणात खर्च होतात. म्हणजे गेल्या १० -१५ वर्षात जगात शस्त्रात्रे वर झालेला संचित/क्युम्युलेटिव्ह खर्च असेल २५-३० ट्रिलयन्स डॉलर्स असेल किंवा जास्त!

यात भर घाला हे बॉम्ब/ती क्षेपणास्त्रे/ते तोफगोळे फुटल्यानंतर ज्या इमारती/पायाभूत सुविधा यांना पूर्णपणे उध्वस्त केले जाते त्यांची किंमत किती असेल; अजून काही हजार बिलियन्स डॉलर्स.

यात भर घाला ज्यावेळी या इमारती/पायाभूत सुविधा पुन्हा बांधल्या जातील (केव्हा जातील माहित नाही) त्यांचा खर्च पण मृत्यू पावलेली माणसे/ सैनिक/ अवयव कायमचे गमावून बसलेले/शारीरिक वेदनातून वर्षानुवर्षे, मरण येईपर्यंत खिचपत पडणारे / आपल्या पोटची मुले, आईवडील, लहान मुले यांना आपल्या डोळ्या देखत हालहाल होताना हताश पणे बघणारे, स्त्रीयांवर अत्याचार, बलात्कार करणारे, स्त्रियांना पळवून नेऊन भोगदासी बनवणारे ..... यांच्या रुपया/ डॉलर्स मधील किमती काढण्याचा कमकुवत पणा कधी करू नका; जग हे पहिल्यापासून असेच हिंसक राहिले आहे; अश्रू गाळणे, हिंसेला विरोध करणे म्हणजे तुमच्यात पुरुषार्थ नाही राहिला असे तत्वज्ञान अंगिकारा, सगळ्यात बेस्ट तत्वज्ञान.

व्हायरल

फुकटचं खाण्याची सवय लावू नका

दूर दूर जाऊन फुलांमधला मध व मकरंद गोळा करून आणणे आणि परोपकारार्थी त्या फुलांचे परागीभवन साधणे हा मधमाशांचा स्थायीभाव. अर्थात काहीतरी घेतल्यावर आपण काहीतरी देणं लागतो, हे निसर्गातःच ठरलेलं असतं, म्हणून ''परोपकारार्थी परागीभवन'' म्हटलं.

बरं हे दूर दूर म्हणजे किती? तर घराबाहेर दहा फुटांपासून तीन किमी पर्यंत! सुगीच्या दिवसांत धमाशांना त्यांचं खाद्य त्यांच्या पोळ्याच्या जवळपास मिळतं, तर शुष्क वेळी दूरवर जाऊन त्या खाद्य पाणी गोळा करतात आणि आपलं घर ''खातंपितं'' ठेवतात. त्यांच्या कष्टाची कल्पना त्याचं पोळं विस्कटून चोरुन मध खाणाऱ्या माणसाला येणार नाही. कृत्रिम रीतीने मधमाशा पाळून मध निर्मिती आणि शेती उत्पादनात वाढ केली जाते. यातही पाळलेल्या मधमाशा बाहेर जाऊन आपलं खाद्य जमा करतात. शुष्क दिवसांत मात्र त्यांना दूरवर जाऊ लागू नये म्हणून गुळाचं किंवा साखरेचं पाणी पोळ्याच्या जवळपास ठेवलं जातं. तज्ज्ञांच्या मते मधमाशांना असं कृत्रिम खाद्य देणे योग्य नाही. त्यामुळे बाहेर जाऊन खाद्य मिळवण्याच्या त्यांच्या सवयीत बदल होऊ शकतो आणि असं काही तरी ''बाहेरचं'' खाऊनही त्यांच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम होऊ शकतो. शिवाय मिळणारे उत्पादन (मध) निकृष्ट दर्जाचे असू शकते. आपल्या देशातील कष्टकरी, शेतकरी वर्ग वर्षभर राबराब राबून स्वतःच्या गरजा भागवतात. शेतकरी वर्ग अन्नधान्यांचे उत्पादन घेतो, तर कष्टकरी कामगार वर्ग आपल्या मिळकतीतून गरजेचे अन्नधान्य विकत घेतो. परंतु देशात असणाऱ्या रास्त दराने धान्य वितरण प्रणाली, म्हणजेच रेशन दुकानाद्वारे कोरोनाच्या प्रभावापासून फुकट धान्य वितरण केले जाते. धान्याची गुणवत्ता तथास्तु असतेच शिवाय फुकट मिळत असल्याने धान्य पिकवण्याची मानसिकता हळूहळू कमी होऊ लागली आहे. त्यामुळे कसदार शेतजमिनी ओसाड पडत आहेत आणि कष्टाची सवय मोडते की काय अशी शंका येत आहे. निकृष्ट दर्जाचे अन्न खाल्ल्याने माणसाच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावरही त्याचा वाईट परिणाम होत आहे. यालाच स्लो पॉयझनिंग म्हणतात.

पिढ्यान् पिढ्या, वर्षोनुवर्षे घराबाहेर पडून मध गोळा करण्याच्या संस्कारांना बगल देऊन बशीतल्या गुळचट पाण्यापासून मध निर्मिती करण्यास मधमाशांना भाग पाडले जाते आणि त्यामुळे त्या आळसावल्या जात आहेत. पिढ्यान् पिढ्या शेतात राबून अन्नधान्य पिकवण्यासाठी संस्कृती मोडून फुकटचं खाण्याची सवय शेतकरी, कष्टकऱ्यांना लावली जात आहे. माणसांना अशा गरज नसलेल्या अवास्तव सुविधा देऊन उपकाराच्या ओझ्याखाली ठेवून केवळ मतं देण्यापुरती ऊर्जा दिली जात आहे. धान्य देतानाचे फोटो, व्हिडिओ काढून व्हायरल केले जात आहेत, हे वेगळेच. देशातील जनतेला रोजगाराभिमुख शिक्षण देऊन स्वावलंबी करणे, हे सरकारचं प्राथमिक आणि उच्चतम लक्ष्य असायला हवे. जाहिराती, धार्मिक स्थळांची निर्मिती अशा अनुत्पादित बाबींवर केला जाणारा खर्च शिक्षणावर केला पाहिजे. मोफत अन्नधान्य देण्याऐवजी मोफत उच्च शिक्षण द्यायला हवं आणि तिथला प्रवेश जातीवर आधारित नाही तर गुणवत्ता आधारित द्यायला हवा. तरच कसदार विद्याधन निर्माण होईल. परंतु आम्ही महसुली उत्पन्न वाढावे म्हणून दारू दुकानांची संख्या वाढवतो आणि निकृष्ट अन्नधान्य देऊन मतांचा टक्का वाढवतो. पिंजऱ्यात पोपट पाळून त्याचा विठू-विठू आवाज ऐकून मालक सुखावतो, पण तो पोपट आनंदाने बोलत नसून ''मला सोड रे.....!'' अशी आर्त साद घालत आहे, हे कुठं मालकाला समजत असतं !

रत्नाकर रहाटे

लोकसंसद

'गिनीज'मध्ये भारत

जगभरातील सर्व अद्वितीय विक्रमांच्या नोंदी ठेवणाऱ्या गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डची २०२४ नवी आवृत्ती भारतातील पेंग्विन रँडम हाऊसने नुकतीच प्रकाशित केली. यामध्ये पृथ्वी, जलचर, मानव, रेकॉर्डो लॉजी, साहस, इतिहास, विज्ञान-तंत्रज्ञान, कला-माध्यम आणि क्रीडा या नऊ विषयांच्या अनुषंगाने जगातील २ हजार ६३८ विक्रमांचा उहापोह करण्यात आला आहे. विशेष म्हणजे त्यात भारताच्या ६० हून अधिक अद्वितीय वैश्विक वैशिष्ट्यांचा समावेश केला गेला आहे. या विक्रमांपैकी केरळचे शिल्पकार कनई कुन्हीरामन यांनी ८७ फूट लांब आणि २५ फूट उंचीची काँक्रिटपासून तयार केलेली जलपरी नावाची जगातील सर्वात मोठी मूर्ती, ९३०० मिमी इतका सर्वाधिक पाऊस पडण्याचा मेघालयाच्या चेरापुंजीच्या नावावर असलेला विक्रम, कोलकात्याचे सालू चौधरी आणि त्यांची पत्नी नीना चौधरी या दोघांनी कारने पृथ्वी प्रदक्षिणा करून ४० हजार ७५ किलोमीटरचे कापलेले विक्रमी अंतर, महाराष्ट्राच्या नागपूरची २९ वर्षीय, २४.७ इंच उंची असलेली ज्योती आमगे ही जगातील सर्वात कमी उंचीची महिला, रोजम वाद्य वाजवणारे त्रिपुराचे शेवटचे भारतीय लोकसंगीतकार थांगा डालौंग, इत्यादी विक्रमांची नोंद घेण्यात आली आहे. खरे तर प्राचीन संस्कृती लाभलेल्या आपल्या भारत देशात गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद होऊ शकतील अशी असंख्य नैसर्गिक स्थळे तसेच मानवाने निर्माण केलेली एकमेवाद्वितीय अशी अनेक मंदिरे व अन्य वास्तु आहेत. त्याची दखल घेतली तर या यादीमध्ये भारतीय विक्रमांची निश्चितच भर पडेल.

- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी

प्रेरणा

बाग

एका गावातल्या एका धनिकाला फुलांची फार आवड होती. त्याने चार ठिकाणं शोधून, माहिती काढून एका ठिकाणावरून फुलांचं सर्वोत्तम बियाणं मिळवलं आणि अगदी निगुतीने बाग फुलवली. बागेत सुरेख फुलं फुलली. त्यांचा सुगंध दरवळू लागला. त्यांचे रंग मनाला आल्हाद देऊ लागले.

फक्त एक गडबड होती. या फुलांमध्ये मधूनच काही जंगली फुलंही फुलली होती. ती मधूनमधून डोकावत होती. थोडं तण माजलं होतं. त्या धनिकाने ते तण उपटून काढलं. ते पुन्हा उगवायचं, वाढायचं. पुन्हा जंगली फुलं फुलायची. तो अस्वस्थ झाला. त्याला तणनाशक औषधाची माहिती मिळाली. ते आणण्याचा विचार केला, तेव्हा एक अनुभवी माळी म्हणाला, औषधाला तण आणि फुलझाड यांच्यातला फरक फार कळत नाही. हे औषध तण मारेलच, पण फुलझाडांचंही नुकसान केल्याशिवाय राहणार नाही. गोंधळात पडलेला तो माणूस शेवटी गावातला शहाणासुर्ता माणूस म्हणून ख्याती असलेल्या मुल्ला नसरुद्दीनकडे गेला. मुल्लाला त्याने सगळी अडचण समजावून सांगितली. मुल्ला हसून म्हणाला, ही तुझी बाग ना लग्नासारखी आहे. इतकी फुलं फुलली आहेत, इतकं सगळं छान आहे. त्याकडे पाहा. जे काढून टाकता येत नाही, सर्वस्वी नष्ट करता येत नाही, त्याच्यावर प्रेम करता आलं तर फारच चांगलं. ते जमत नसेल तर त्याचा स्वीकार कर. ते तू मागितलं नव्हतंस हे खरंच आहे. पण, तो आता तुझ्या बागेचाच भाग आहे.

-ओशो

नि व ड क

आरोपीला तीन महिन्यांची शिक्षा

खोपोली : खालापूर येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो यांच्या न्यायालयात फिर्यादी असलेले देवन्हावे गावातील गणेश नागे यांनी मेघा.एम. कांबळे यांच्याविरोधात चेकची रक्कम न दिल्याबाबत तक्रार दाखल केली होती. याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत सहदिवाणी कनिष्ठ न्यायाधीश पी.एम. माने यांच्या कोर्टात सुनावणी घेण्यात आली. यावेळी फिर्यादी गणेश नागे यांच्या वतीने ॲड. जयेश तावडे यांनी, तर आरोपीच्या वतीने ॲड. सत्यवान वाडेकर यांनी काम पाहिलं.

उपसरपंचपदी सुशिप्ता जाधव

नेरळ : कर्जत तालुक्यातील तिवरे ग्रुप ग्रामपंचायतीच्या रिक्त असलेल्या उपसरपंचपदी सुशिप्ता अमर जाधव यांची बिनविरोध झाली आहे. मावळते उपसरपंच संतोष भासे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने ही निवडणूक घेण्यात आली. संतोष भासे यांनी आपल्या पदाचा राजीनामा सरपंच लता दगडे यांच्याकडे सुपूर्द केला होता. त्यामुळे रिक्त असलेल्या उपसरपंचपदासाठी निवडणूक घेण्यात आली. सुशिप्ता जाधव यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

बालविवाहाविरोधात जागृती

पनवेल : माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात गर्भलिंग चाचणी होऊन स्त्री-भ्रूणहत्या केली जाते. त्याचबरोबर दुर्गम भागात बालविवाहसुद्धा मोठ्या संख्येने करण्यात येतो. अल्पवयीन मुलींना त्यांचा पुढे शारीरिक आणि मानसिक त्रास होतो. त्यातूनच कुपोषणाचा जन्म होतो. याबाबत सरकारने कायदा केला असला गाव-वाड्यांवर जनजागृतीसाठी ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेने पनवेल पेण, उरण, खालापूर आणि कर्जत या परिसरातील वाड्यांवर प्रबोधनपर अभियान हाती घेत याविषयी जनजागृती करण्यात आली.

प्लास्टिक प्रदूषण टाळण्यासाठी

पनवेल : दिवसेंदिवस वाढत जाणारे प्लास्टिकचे प्रदूषणावर उपाय शोधण्यासाठी लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमतर्फे कमळ महिला नागरी सहकारी पतसंस्था आणि पनवेल महानगर पालिका यांच्या सहकार्याने उपक्रम राबविण्यात आला. भाजी मार्केट, पनवेल येथे प्लास्टिक बाटल्या गोळा करण्यासाठी एक लोखंडी पिंजरा बसविण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रांतपाल ला. संजीव सूर्यवंशी, कमळ महिला पतपेढीचे संस्थापक शशिकांत बांदोडकर, महानगरपालिकेचे अधिकारी शैलेश गायकवाड आदींसह इतर मान्यवर उपस्थित होते.

नवरात्रीनिमित्त कार्यक्रम

चौल : अलिबाग तालुक्यातील चौलमळा गावात आई कृष्णादेवीच्या नवरात्र उत्सवाला रविवारपासून प्रारंभ झाला. या उत्सवात नऊ दिवस युवक मंडळ, महिला मंडळ, ग्रामस्थ मंडळ यांच्याकडू विविध सांस्कृतिक आणि मनोरंजनाच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आई कृष्णादेवीचा हा उत्सव पंचक्रोशित प्रसिद्ध असून, भाविक मोठ्या संख्येने येत असतात, अशी माहिती गावचे प्रमुख रवींद्र घरत, जितेंद्र पाटील यांनी दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवक मंडळ अध्यक्ष महेंद्र नाईक मेहनत घेत आहेत.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१६ ऑक्टोबर

१) श्री. वामन दामोदर पाटील
विद्यानगर, अलिबाग, १६-१०-१९३७
२) श्री. वसंत परशुराम वर्तक
विद्यानगर, अलिबाग, १६-१०-१९५२
३) श्री. ॲड. कृष्णा दाजीबा पाटील
अलिबाग, १६-१०-१९५६
४) श्री. यशवंत लक्ष्मण राणे
आवास, अलिबाग, १६-१०-१९४८

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

वाढदिवस साजरा करा अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

सौ. उर्मिला वसनजी सावला, ठाणे

शब्बीरभाई बिर्याणीवाले यांचे निधन

। कर्जत । प्रतिनिधी ।

शब्बीरभाई महापुळे (८४) यांचे गुरुवारी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. शब्बीरभाई यांची चविष्ट बिर्याणी माथेरानला येणाऱ्या पर्यटकांमध्ये लोकप्रिय आहे. गेल्या चाळीस वर्षांपासून ते या हॉटेल व्यवसायात होते. माथेरानमधील सर्व स्तरातून शब्बीरभाई यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

मांडवा जेट्टी समस्यांच्या गर्तेत

अनेक सुविधांचा अभाव; प्रशासनाने लक्ष द्यावे, प्रवाशांची मागणी

। सोगाव । वार्ताहर ।

मुंबई येथून पर्यटकांना व नागरिकांना जलमार्गाने कोकणात जाण्यासाठी जलद व सोयीचा मार्ग म्हणजे रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील मांडवा हे प्रमुख ठिकाण आहे. या ठिकाणाहून अलिबाग तालुक्यातील मांडवा, सासवणे, किहीम, वरसोली, आक्षी, नागाव या ठिकाणी समुद्रकिनारी तास ते दीड तासात जाता येते, तर मुरुड जंजिरा येथेसुद्धा जाण्यासाठी सोयीचा मार्ग असल्याने पर्यटक व नागरिक याचा वापर अधिक करतात. परंतु, मांडवा प्रवासी टर्मिनल जेट्टीवर अनेक समस्या व सुविधांचा अभाव असल्याने प्रवासी पर्यटक व नागरिकांकडून मुंबई पोर्ट ट्रस्ट व महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड प्रशासनाच्या कारभावर नाराजी व्यक्त करीत आहेत.

मांडवा जेट्टीवर दरवर्षी १५ लाखांपेक्षा जास्त प्रवाशांची चढ-उतार होत असल्याने व दररोज अजंठा, मालदार, अपोलो, पीएनपी या कंपनीच्या बोटींच्या सहाय्याने या मार्गाने हजारोंच्या संख्येने प्रवासी प्रवास करत आहेत. परंतु, त्यादृष्टीने या ठिकाणी असणाऱ्या सोयीसुविधा या अगदी तुटपुंज्या व निकृष्ट दर्जाच्या आहेत. जेट्टीवरील असणारी पत्र्याची शेड गंजलेल्या व तुटण्याच्या स्थितीत आहेत. हे पत्रे वाऱ्याने निखळून प्रवाशांच्या अंगावर पडून मोठ्या अपघाताची दाट शक्यता नाकारता येत नाही. जेट्टीवर रांगेत उभे राहण्याची व्यवस्था असलेल्या ठिकाणी आजारी रुग्ण, गरोदर माता, वयोवृद्ध यांना बसण्यासाठी कोणतीही आसन व्यवस्था नाहीत, त्यामुळे प्रवाशांना ताटकळत उभे राहावे लागत असल्याने त्या प्रवाशांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

जेट्टीवरील ठिकाणी प्रवाशांना मोफत पिण्याच्या पाण्याची कोणतीही व्यवस्था उपलब्ध नसल्याने पाणी बाटली विकत घेण्यासाठी वाहनतळाकडील दुकानांकडे जावे लागते, यामुळे प्रवाशांना आर्थिक भुर्दंड तर बसतोच, शिवाय शारीरिक व मानसिक त्रास होतो तो वेगळाच. वाहनतळापासून ते जेट्टीवरील अंतर जास्त प्रमाणात असल्याने याठिकाणी अपंगांना, गरोदर माता, लहान मुलांच्या माता, वयोवृद्ध, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आदी शारीरिक क्षमता कमी व कमजोर असलेल्या प्रवाशांना चालत येण्या-जाण्यासाठी मोठा त्रास होतो, शिवाय यांच्या सेवेसाठी असलेल्या वाहनांची संख्यादेखील फक्त दोनच आहेत, त्यादेखील सकाळी लवकर व संध्याकाळी उशिरा सेवा उपलब्ध नसल्यामुळे रुग्ण व अपंग, ज्येष्ठ नागरिक यांना खूपच त्रास होत आहे. तसेच ही वाहने वारंवार नादुरुस्त होत असल्याने प्रवाशांना नाहक त्रास होत आहे. बोटीत बसताना व उतरताना अपंग व रुग्णांसाठी व्हीलचेअरची सुविधाही नसल्याने अशा प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

अशा अनेक समस्या मांडवा जेट्टी प्रवासी टर्मिनलवर असून, या समस्या व सुविधांकडे मुंबई पोर्ट ट्रस्ट व महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड प्रशासन कधी लक्ष देईल, असा प्रश्न प्रवासी विचारत आहेत.

करोडो रुपये खर्चूनही प्रवाशांचे हाल

- **राजपुरी जेटीवर बसायला जागाच नाही**
- **कँटिन व निवारा शेड टेंडरविना बंद**

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी राजपुरी येथून शिडांच्या बोटींचा वापर केला जातो. राजपुरी येथे जंजिरा किल्ला पहाण्यासाठी शेकडोंच्या संख्येने पर्यटक येत असतात. या पर्यटकांची चांगली व्यवस्था व्हावी यासाठी महाराष्ट्र मेरी टाइम बोर्डाकडून कोटी रुपये खर्चून भले मोठे प्रवासी टर्मिनल बांधण्यात आले आहे. यामध्ये बसण्याची व्यवस्था, अल्पोपहार, स्वच्छतागृह व शुद्ध पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती; परंतु प्रवासी टर्मिनल टेंडर न झाल्याने व पूर्वीच्या ठेकेदाराने ठेक्याची रक्कम न भरल्याने कॅन्टीन व निवारा शेडला कुलूप लागले ते अद्याप सुरू झालेले नाही. त्यामुळे जंजिरा किल्ला पाहायला येणाऱ्या पर्यटकांना जेटीवर बसायला जागा नाही. नाश्त्यासाठी कॅन्टीन नाही, कडक उन्हात उभे राहून तिकीट काढायचे आणि बोटीत बसायचे व बोटीतदेखील सावली नसल्याने पर्यटकांना त्रास होत असून, याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप पर्यटकांकडून करण्यात येत आहे.

प्रवासी टर्मिनलची इमारत महाराष्ट्र मेरी टाइम बोर्डाच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयाकडून पाच वर्षांच्या कराराने बून केटरर्स यांना देण्यात आली होती. परंतु, सदरच्या बून केटरर्सकडून प्रवासी टर्मिनलची इमारतीची फारशी काळजी घेतली जात नाही. गेले कित्येक महिन्यांचे बिल न भरल्यामुळे मुरुड महावितरणकडून येथील वीज जोडणी तोडण्यात आली होती. ठेक्याची रक्कम न भरल्याने मेरोटाईम बोर्डाकडून बंद करण्यात आले. स्वच्छतागृहाला पाण्याचा तुटवडा होऊन सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. प्रवासीवर्गाला पंखासुद्धा उपलब्ध होत नाही. त्यामुळे एकंदर या ठिकाणी मोठी गंभीर समस्या निर्माण झाली आहे. पर्यटकांना कोणतीही सुविधा उपलब्ध होत नसल्याने पर्यटकसुद्धा त्रस्त झाले आहेत. पर्यटकांसाठी सुविधा मिळावी म्हणून स्थानिकांना टेंडर देण्यात यावे, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे. लवकरात लवकर टेंडर करून जेटीवरील सर्व सुविधा सुरु कराव्यात, अशी मागणी पर्यटक महाराष्ट्र मेरी टाइम बोर्डाकडे करीत आहेत.

> **२०२१ साली आलेल्या वादळामुळे जेटीच्या प्रवासी टर्मिनलची इमारतीवरील सोलर पॅनल व पत्रेही उडाल्याने मोठे नुकसान झालं. त्यानंतर बून केटरर्सकडून इमारतीचे भाडे न भरल्याने काहीकाळ पार्किंग व कँटिन सेवा बंद होती. परंतु, पर्यटकांच्या मागणीनुसार मेरीटाईम बोर्डाने स्वतःचे कर्मचारी लावून पार्किंग सुरु केली. कँटिनचा ठेका पाच वर्षांचा असल्याने ठेक्याचा काही काळ बाकी असल्याने नवीन ठेका देण्यात आला नाही. सद्य सोलर पॅनल दुरुस्त करून वीजपुरवठा सुरू करण्यात आला आहे. लवकरच नवीन टेंडर काढून कॅन्टीन सेवा सुरु होईल. पर्यटकांच्या सुविधांवर लक्ष देण्यात येईल.**
> **– प्रमोद राहुळ, मेरीटाईम बोर्ड अधिकारी**

गुरेचोर पोलिसांच्या जाळ्यात

- **मुनाफ सईद धुतरेवर गुन्हा दाखल**
- **महिंद्रा पिकअपही जप्त**

। आपटा । वार्ताहर ।

महिंद्रा पिकअप टेम्पोमधून बेकायदेशीर व अवैधरित्या गुरांची (बैलांची) चोरी करणाऱ्या एका तरुणाला तीन बैल आणि वाहतूक करणारा महिंद्रा पिकअप टेम्पोसह रसायनी पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, बुधवार, दि.११ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.४५ च्या सुमारास सावरोली-खारपाडा रस्त्यावरून एका महिंद्रा पिकअप टेम्पोमधून बेकायदेशीररित्या बैल (गुरे) नेणार असल्याची खात्रीलायक माहिती रसायनी पोलिसांना प्राप्त झाली होती. रसायनी पोलीस ठाण्यात कर्तव्य बजावत असलेले रसायनी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ बालवडकर यांच्या परवानगीने पोलीस उपनिरीक्षक महेश धोंडे, आर.टी. सूर्यवंशी, पोलीस हवालदार श्री. पानपट्टे, गोपनीय विभागाचे अंमलदार राहुल भडाळे यांच्या पथकाने सारसई बस स्टॉपजवळ बुधवारी (दि.११) सकाळी ९.४५ दरम्यान खारपाडा बाजूकडून रसायनीच्या दिशेने येणारा महेंद्रा पिकअप टेम्पो क्र. एमएच ४६ बीएम ७५९० यामधून एक तांबूस रंगाचा व दोन काळ्या रंगाचे प्रत्येकी २० हजार रुपये किंमतीचे एकूण तीन बैल दाटीवाटीने गाडीत बांधलेले आढळून आले. सदर चालकाकडे पोलिसांनी परवाना मागितला असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याने पोलिसांनी मुनाफ सईद धुतरे (३२) धंदा चालक, रा. हाळखुर्द, पो. शिळाफाटा खोपोली, ता. खालापूर याच्यावर गुन्हा करण्यात आला असून, त्याच्या ताब्यातील ती बैल (गुरे) व महिंद्रा पिकअप गाडी जप्त करण्यात आली आहे. आरोपी मुनीम सईद धुतरे याला गुरुवारी पनवेल न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

या घटनेचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश धोंडे हे करीत आहेत.

रोटरी कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन

। रसायनी । वार्ताहर ।

आजच्या जगात कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी योग्य कौशल्ये असणे आवश्यक आहे. दुर्दैवाने वंचित समुदायातील अनेक व्यक्तींना ही कौशल्ये विकसित करण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण आणि शिक्षण उपलब्ध नाही. यामुळे दारिद्र्य आणि गैरसोयीचे एक चक्र निर्माण होते जे मोडणे कठीण आहे. या समुदायांना सक्षम बनवण्यात आणि त्यांना स्वतःसाठी एक चांगले भविष्य घडवण्यासाठी रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा यांनी डिस्ट्रिक्ट गव्हर्नमेंट रोटरीयन मंजू फडके यांच्याहस्ते रीस येथीस गुड हेल्थ हॉस्पिटल तळ मजल्यावर रोटरी कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन करण्यात आले आहे.

यावेळी अध्यक्षा रेश्मा कुरूप यांनी सांगितले की, या केंद्रात वंचित मुली आणि मुलांना टेलरिंग, ब्युटीशियन, मेणबत्ती बनवणे, एमएससीआयटी कोर्स, नर्सिंग कोर्स आणि इतर अनेक कोर्सेस उपलब्ध करून देणार आहोत. कौशल्य विकास कार्यक्रम हे वंचित समुदायांना सशक्त बनवण्यासाठी आणि त्यांना स्वतःसाठी एक चांगले भविष्य निर्माण करण्यासाठी एक शक्तिशाली साधन आहे. योग्य कौशल्ये आणि प्रशिक्षणाने, वंचित समुदायातील व्यक्ती गरिबीचे चक्र खंडित करू शकतात आणि त्यांची पूर्ण क्षमता साध्य करू शकतात, सर्वांसाठी उज्ज्वल भविष्यासाठी योगदान देऊ शकतात. हा एक अत्यंत शाश्वत आणि परिणामकारक प्रकल्प आहे जो अनेकांच्या जीवनाला स्पर्श करेल आणि बदल घडवेल, असेही श्रीमती कुरुप यांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रमाला अध्यक्ष रोटेरीयन रेश्मा कुरूप, सचिव सुशांत उचील, गणेश म्हात्रे, सुनील कुरूप, डॉ. लेख उचील, सुनील भोसले, रुतुजा भोसले, गणेश मेणसे, प्रकाश गायकवाड, विजय पाटील, प्रतीक्षा कुरंगळे, शशिकांत शानभाग, भारती म्हात्रे, उषा मेणसे, जयश्री पाटील, रेवती गायकवाड, समिधा थोरात, रोटरी क्लब ऑफ पेणच्या अध्यक्षा मधुबाला, संयोगिता टेमघरे, जयेश, अपर्णा मोरे, सारिका साळवी व इतर मान्यवर उपस्थित होते.

विषारी औषध प्यायल्याने एकाचा मृत्यू

। माणगाव । प्रतिनिधी ।

तालुक्यातील तासगाव आदिवासीवाडी येथील ४० वर्षीय तरुणाने कोणत्यातरी अज्ञात कारणास्तव गवतावर मारण्याचे विषारी औषध प्राशन केल्याने अलिबाग येथील सिव्हील रुग्णालयात औषधोपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. सदरील घटना रविवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी पहाटे ५.४५ वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेची खबर अल्पेश राजाराम खडतर (२२) रा. तासगाव आदिवासीवाडी, ता. माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिल्यावर या घटनेची नोंद पोलीस ठाण्यात रविवार दि. १५ ऑक्टोबर रोजी दाखल करण्यात आली.

याबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, घटनेतील मयत राजाराम धुलाजी जाधव (४०) रा. तासगाव आदिवासीवाडी, ता. माणगाव याने रविवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास गवतावर मारण्याचे विषारी औषध प्राशन केल्याने त्याला अधिक औषधोपचाराकरीता अलिबाग येथील सिव्हील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. याठिकाणी त्याच्यावर औषधोपचार चालू असताना त्याची प्रकृती अधिक गंभीर होऊन ते मयत झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू नोंद करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक आर.एस. जाधव अलिबाग पोलीस ठाणे करीत आहेत.

आपदा मित्र दिनेश सुतार यांचा सन्मान

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरानच्या आपदा मित्रांकडून आपत्ती व्यवस्थापन तसेच मदतीचा हात दिल्यामुळे आपदा मित्र दिनेश सुतार यांचा सन्मान नैसर्गिक आपत्ती निवारण दिनाचे औचित्य साधून करण्यात आला. खालापूरचे तहसीलदार यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यात किल्ले रायगड येथे स्वयंसेवक म्हणून अभूतपूर्व कामगिरी केल्यामुळे तसेच इर्शाळवाडीतील दुर्घटनेत आपत्ती व्यवस्थापनात तीन दिवस सतत मदत केल्यामुळे त्यांच्या कामाची प्रशासनाकडून दखल घेऊन माथेरान आपदा मित्र दिनेश सुतार यांचा सन्मान करण्यात आला. जागतिक स्तरावर नैसर्गिक आपत्ती निवारण दिनाचे औचित्य साधून खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या हस्ते त्यांच्या दालनात प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, खोपोली येथील आपद्ग्रस्तांच्या मदतीसाठी या संस्थेचे गुरुनाथ साठेलकर, विजय भोसले, अमोल कदम, विशाल चव्हाण, अमोल ठिकेकर आदी उपस्थित होते. महाडच्या तत्कालीन उपविभागीय अधिकारी प्रतिभा पुदलवाड यांच्या संकल्पनेतून हा सन्मान देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

सिडको प्रशासन नरमले

पूलप्रश्नी तोडगा काढण्याचे आश्वासन १७ ऑक्टोबर रोजी बैठकीचे आयोजन

। उरण । वार्ताहर ।

बोकडविरा सिडको कार्यालयाजवळील पूल नादुरुस्त झाल्याने गेली तीन वर्षांपासून एसटी बस बंद करण्यात आली आहे. त्याचा नाहक भुर्दंड बोकडविरा, फुंडे, डोंगरी व पाणजे येथील जनतेला सहन करावा लागत होता. त्याच्या निषेधार्थ जनवादी महिला संघटनेच्या माध्यमातून धरणे आंदोलन करण्यात आले होते. सिडकोला नमते घेऊन अखेर येत्या १७ ऑक्टोबर रोजी बैठकीचे आयोजन करून योग्य तो तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

जनवादी महिला संघटनेच्या माध्यमातून बोकडविरा, फुंडे, डोंगरी व पाणजे येथील महिला व चारही गावातील ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व नागरिक कडकडीत उन्हात सहभागी झाले होते. उरण-पनवेल राज्य रस्त्यावरील पूल धोकादायक झाला आहे. त्यामुळे या रस्त्यावरील एसटी आणि एनएमएमटीची बस तसेच अवजड वाहनांची वाहतूक बंद केली आहे. ते जाऊ नये म्हणून दोन्ही साईडला हाईट गेट बसविण्यात आले आहे. त्यामुळे बोकडविरा, फुंडे, डोंगरी व पाणजे या चारही गावातील विद्यार्थी, कामगार, वयोवृद्ध नागरिकांना चार ते पाच किलोमीटर अंतरावरील जेएनपीटी कामगार वसाहतीजवळ किंवा द्रोणागिरी नोड आणि उरणमध्ये बससाठी ये-जा करावी लागत आहे. यामुळे मात्र नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याने नाहक आर्थिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे.

याबाबत जनवादी महिला संघटनेच्या माध्यमातून गेली वर्षभरापासून पाठपुरावा सुरू आहे. सातत्याने पाठपुरावा करूनही सिडको याकडे दुर्लक्ष करीत असल्याने जनवादी महिला संघटनेने आंदोलनाची हाक दिली होती. गुरुवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी भर रस्त्यात नादुरुस्त पुलाजवळच आंदोलनास सुरुवात झाली. कडकडीत ऊन असूनही बोकडविरा, फुंडे, डोंगरी व पाणजे गावातील महिला व ग्रामस्थ, सरपंच, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तरीही सिडको प्रशासन जुमानत नसल्याने अखेर महिला रणरागिणी बनून सिडको कार्यालयाला घेराव घातला. महिलांच्या आक्रमकतेपुढे झुकत येत्या १७ ऑक्टोबर रोजी बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. यानंतर आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी बोकडवीरा सरपंच अपर्णा पाटील, पाणजे सरपंच लखपती पाटील, फुंडे उपसरपंच चंद्रकांत म्हात्रे, कामगार नेते भूषण पाटील, मधुसूदन म्हात्रे, किसान सभेचे संजय ठाकूर, रामचंद्र म्हात्रे, डीवाय एफआयचे राकेश म्हात्रे, महिला संघटनेच्या प्रमिला म्हात्रे, सविता पाटील, कुसुम ठाकूर, कुंदा पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

क्षणचित्र

पामबीचवर वाहने सुसाट

नवी मुंबई : गेल्या काही वर्षांपासून कनवी मुंबई शहराचा क्वीन नेकलेस म्हणून नावलौकिक असलेला पामबीच मार्ग सुसाट वाहने आणि अपघातांसाठी प्रसिद्ध होत आहे. त्यामुळे या मार्गवर वाढणाऱ्या आपघातांला ब्रेक लावण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येतात. याठिकाणी वाहन चालकांनी पामबीच मार्गवर वेगमर्यादेत वाहन चालविण्यासाठी वेगमर्यादा दर्शविणारे डिजिटल फलक बसवले आहेत. मात्र, हे डिजिटल फलक सध्या बंद स्थिती असून, वाहने सुसाट सुरू आहेत.

अतिक्रमणांवर कारवाई

नवी मुंबई : महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे याविरोधात कारवाई सुरू केली असून, महापालिका आयुक्त यांच्या निर्देशानुसार अतिक्रमण विभागाचे उपायुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली बेलापूर विभागात महेश हॉटेल, प्रणाम हॉटेल, हॉटेल लक्ष्मी, मालवणी कट्टा, अश्विथ हॉटेल, मॅकडोनाल्ड्स, कबाना बार, द स्कॉड, द चाप हाऊस, पॅनेशिया, एस स्पाईस हे हॉटेलचालकांनी अनधिकृतरित्या केलेले बांधकाम तोडण्यात आले.

पुलावर खड्ड्यांचे साम्राज्य

अलिबाग : तालुक्यातील कुरुळ कॉलनीच्या परिसरात असलेल्या पुलावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने रस्त्याची चाळण झाली आहे. याठिकाणी वाहन चालवताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. अनेकदा खड्डे चुकविण्याच्या नादात मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी, संबंधित विभागाने याकडे तात्काळ लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

अलिबाग : तालुक्यातील कुरुळ गावाच्या हद्दीत गिरोबा मंदिराच्या परिसरात असणाऱ्या दोन्ही मोऱ्यांचे सिमेंट कठडे गायब झाले असून, अपघाताची शक्यता आहे. याबाबत नागरिकांनी संताप व्यक्त केल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने याठिकाणी नवीन कठडे बांधण्याऐवजी मोऱ्यांना प्लास्टिक पट्ट्या लावून थातुरमातुर डागडुजी केली आहे. यामुळे चालकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत असून, मोठा अपघात झाल्यास जबाबदार कोण, असा सवाल विचारत आहेत.

नादुरस्त रस्त्यामुळे नाराजी

अलिबाग : तालुक्यातील चौल शितळादेवीच्या उत्सवाला रविवारपासून शुभारंभ झाला आहे. उत्सवकाळात राज्यभरातून देवीच्या दर्शनासाठी भक्तांची मांदियाळी याठिकाणी दिसून येते. परंतु, देवीच्या दर्शनासाठी असणारा रस्ता अनेक ठिकाणी खराब झाला असून, या खड्डेमय रस्त्यामुळे भक्तांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. उत्सवानिमित्त येणाऱ्या भक्तांचा विचार करता आधीच रस्त्याची दुरुस्ती होणे गरजेचे होते, असे मत अनेकांनी व्यक्त केले.

कालव्याचे पाणी पुन्हा पेटणार

▶▶ पाण्यासाठी बळिराजाचा पुन्हा 'एल्गार' ▶▶ सोमवारी पाणी जागर अभियान ▶▶ बाईक, बैलगाडी रॅली, गाण्यांतून प्रबोधन

। धाटाव । वार्ताहर ।

संबंध रायगड जिल्ह्यासह राज्यात चर्चेत आलेल्या कोलाड पाटबंधारेच्या आंबेवाडी ते निवी कालव्याचा पाणीप्रश्न पुन्हा पेटणार असल्याचे स्पष्ट सूतोवाच मिळत आहे. कालव्याच्या पाण्यासाठी सोमवारी जागतिक अन्नदिनी बळिराजा पाणी जागर अभियान आंदोलन करणार आहे. पाटबंधारेच्या कार्यालयासमोरील मुंबई-गोवा महामार्ग रस्तालगत पाण्यासाठी आंदोलन होणार असल्याने सबंध जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

पाणी जागर आंदोलनाची जय्यत तयारी करण्यात आली. यावर्षी कालव्याला पाणी घेतल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाहीत. कालव्याच्या पाण्यासाठी प्रसंगी आत्मदहन करू, असा गर्भित इशारा बळिराजा फाऊंडेशनने पुन्हा एकदा दिला. त्यामुळे सोमवारच्या पाणी जागर आंदोलनातील सहभागी शेतकरी, बळिराजा नेमकी काय भूमिका घेतो, पाटबंधारेचे अधिकारी आंदोलनकर्त्यांनानेमकेकाय आश्वासीत करतात? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. दरम्यान, कालव्याच्या पाण्यासाठी २०१७पासून चाललेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनाकडे शासन, प्रशासन, लोकप्रतिनिधी यांचे लक्ष वेधण्यासाठी प्रारंभी जागर अभियान आहे. कालव्याची तातडीने दुरुस्ती करावी, सिंचन हंगामात कालव्याला पाणी सोडण्यात यावे अन्यथा काय परिणाम होतील? याची प्रशासन, शासनाला कल्पना आहे, अशी प्रतिक्रिया आंदोलनाच्या पूर्वसंस्थेला बळिराजा फाऊंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे यांनी दिली, तर कालव्याच्या पाण्यासाठी बळिराजाने पुन्हा एल्गार केल्याने संबंधित सर्वच प्रशासन अधिक सतर्क झाल्याचे बोलले जात आहे.

सोमवारी सकाळी बळिराजा फाऊंडेशनच्या मध्यवर्ती कार्यालय तळाघर येथून बाईक रॅलीद्वारे आंदोलनाला प्रारंभ होणार आहे. रॅली बोरघर, तळाघर, धाटाव, बारसोली, किल्ला, संभेमार्गे आंदोलन ठिकाणी जाणार आहे. समाज प्रबोधन गाण्यांतून पाण्याचा जागर होईल, यावेळी कोलाड नाका ते आंदोलन जागेपर्यंत बळिराजा फाऊंडेशनचे नेतृत्व बैलगाडीतून शासनाचे लक्ष वेधतील, शासनाला पाण्यासाठीची जाणीव देतील अशी अधिक रूपरेषा सचिव ॲड. दीपक भगत यांनी दिली आहे

आंदोलनात बळिराजा फाऊंडेशनचे पदाधिकारी नेमकी काय भूमिका घेतात? याकडे सबंध जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. दुसरीकडे आंदोलनकर्त्यांना सामोरे जात पाटबंधारेचे मुख्य कार्य. अभियंता मिलिंद पवार काय आश्वासीत करतात, कालव्याची दुरुस्तीबाबत काय माहिती देतात? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान, पाणी जागर आंदोलन यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष विठ्ठल मोरे यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी, ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत. यातून आता कालव्याचे पाणी पुन्हा पेटणार हे अधोरेखित झाले आहे.

पाण्याअभावी भीषण टंचाई

कोलाड पाटबंधारेच्या आंबेवाडी ते निवी कालव्याच्या पाण्याचा इतिहास सर्वश्रुत आहे. कालव्याला आठ-दहा वर्षे पाणी नसल्याने परिसरात ऐन उन्हाळ्यात भयानक दृश्य पाहायला मिळते. पाण्याचा स्रोत संपुष्टात येत असल्याने विहिरी, बोअरवेल आटतात. त्यातच ग्रामपंचायतीच्या अनेक पाणी योजना निकामी ठरत असल्याने मुख्यत: लांढर, बोरघर, तळाघर गावांना भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. कालव्याचा पाणीप्रश्न अखेर ग्रामस्थांनी हातात घेत पाण्यासाठी लढा सुरू केला. कालव्याची तातडीने दुरुस्ती करून कालव्याला पाणी सोडण्याच्या मागणीकडे शासन, प्रशासन, लोकप्रतिनिधी यांचे लक्ष वेधण्यासाठी जागतिक अन्नदिनी कोलाड येथे पाणी जागर अभियान करण्यात येणार आहे.

पाण्यासाठी अनेक आंदोलने

आंबेवाडी ते निवी कालव्याच्या पाण्यासाठी कालवा समन्वय समिती, नंतरच्या बळीराजा फांऊडेशनने आतापर्यंत अनेक आंदोलने केली. १ मे महाराष्ट्र दिनी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण केले. त्याचे पडसाद थेट विधिमंडळात उमटले. कालव्याची दुरुस्ती कामे तातडीने करून पाणी सोडण्यात येईल, असे आश्वासन प्रशासनाने देताच आमरण उपोषण तूर्तास मागे घेतले होते. त्यानंतर कालव्याची दुरुस्ती करून पाणी काही अंतरावर आणण्यात प्रशासनाला यश आले. मात्र, पुढील दुष्काळग्रस्त गावांपर्यंत पाणी पोहोचलेच नाही. त्यामुळे आता पाऊस संपताच बळिराजा आक्रमक झाला. सिंचन हंगामात पाणी सोडण्यात यावे, असा इशारा बळिराजा फाऊंडेशनने निवेदनातून तहसील, पाटबंधारे प्रशासनाला दिला. त्याच पार्श्वभूमीवर सोमवारी जागतिक अन्न दिनी कोलाड येथे पाणी जागर अभियान होत आहे.

माथेरानच्या हातरिक्षा आजपासून संपावर

। कर्जत । प्रतिनिधी ।

- **माथेरानच्या श्रमिक रिक्षा संघटनेतर्फे आंदोलनाचा इशारा**
- **ई-रिक्षाबाबत अहवाल सादरीकरणास प्रशासनाची दिरंगाई**

सनियंत्रण समितीने ई-रिक्षाचा अहवाल पायलट प्रोजेक्ट यशस्वीरित्या पूर्ण होऊनदेखील सर्वोच्च न्यायालयात सादर न केल्याने श्रमिक रिक्षा संघटनेतर्फे सोमवारपासून तीव्र आंदोलन सुरू करण्यात येणार आहे. सर्व ९४ हातरिक्षा सोमवारपासून बेमुदत बंद करण्यात येणार आहेत, तर गुरुवार, दि १९ तारखेपासून राम चौकात रिक्षा संघटना बेमुदत उपोषणाला बसणार आहेत.

माथेरानच्या हात रिक्षाचालकांची अमानवीय प्रथेतून मुक्ती व्हावी त्यांना आरोग्यदायी व आत्मसन्मानाचे जीवन जगता यावे यासाठी सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे यांनी पर्यावरणपूरक अशा ई-रिक्षाच्या परवानगीसाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. दि. १२ मे २०२२ रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. राज्य सरकारच्या वकिलांनी हातरिक्षा चालकांना ई-रिक्षा देण्याची तयारी असल्याचे सांगितले आहे.

तत्पूर्वी, कोणत्या प्रकारची ई-रिक्षा धावू शकते याच्या चाचपणीसाठी तीन महिन्यांच्या पायलटची मागणी केली होती. त्यानुसार कोर्टाने मागणी मान्य केली व कशा प्रकारे ई-रिक्षा सुरू करणार याची माहिती दोन महिन्यांत सादर करण्यास सांगितले आहे. तरीदेखील अहवाल सादर न झाल्याने ई-रिक्षा सुरू होऊ शकल्या नाहीत, त्यामुळे श्रमिक रिक्षा संघटनेने तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेतला असल्याचे अध्यक्ष शकील पटेल यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे सप्टेंबर महिन्यात माथेरानला आले होते. त्यांनी ई-रिक्षाच्या प्रकल्पाची संपूर्ण माहिती समजून घेतली, तेव्हा स्थानिकांनी त्यांना सांगितले की, ई-रिक्षा व क्ले पेव्हर ब्लॉक्स दोन्ही वेगळे विषय आहेत, त्यामुळे ब्लॉक्सच्या अहवालाला दिरंगाई होत असल्याने ई-रिक्षाचा अहवाल थांबवू नये. तो तात्काळ सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात यावा. डॉ. म्हसे यांनी माथेरान पालिकेचे मुख्याधिकारी वैभव गारवे यांना सरकारी वकिलांना भेटण्यासाठी दिल्लीला पाठवले होते. तरीदेखील ई-रिक्षाचा अहवाल सादर केला नाही.

माथेरानमधील पांडे प्ले ग्राऊंड भागातील
क्ले पेव्हर ब्लॉक सुस्थितीत

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान शहरात पर्यावरणपूरक रस्ते बनविले जात असून, क्ले पेव्हर ब्लॉक लावून रस्ते धूळविरहित केले जात आहेत. मात्र, शहरातील अनेक रस्त्यांवरील क्ले पेव्हर नित्कृष्ट दर्जाचे निघाले असून, ते निखळून गेल्याचे आढळून येत आहेत. मात्र, शहरातील पांडे प्ले ग्राऊंड ते लेक या भागातील रस्त्यावर बसविण्यात आलेले क्ले पेव्हर दीड वर्षानंतरदेखील आहेत तसेच आहेत. दरम्यान, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या सर्व रस्त्यांचे ऑडिट करणार आहे काय, असा सवाल भाजपचे कर्जत तालुका माजी उपाध्यक्ष विलास पाटील यांनी केला आहे.

क्ले पेव्हर ब्लॉक खराब होण्याची अशी स्थिती माथेरानमधील बहुसंख्य रस्त्यांवर दिसून येत आहे. मात्र, याच काळात माथेरानमधील पांडे प्ले ग्राऊंड ते शारलोट लेक या भागातील रस्त्यात क्ले पेव्हर ब्लॉक माथेरान नगरपरिषदेकडून लावण्यात आले होते. त्यासाठी राज्य सरकारच्या नगरविकास विभागाने निधी दिला होता आणि त्या रस्त्याचे बांधकाम तत्कालीन मुख्यधिकारी सुरेखा भणगे यांनी निविदेत नमूद केलेल्या प्रत्येक कामे संबंधित रस्त्याचे ठेकेदार यांच्याकडून करून घेतली होती. त्यावेळी रस्त्यावर लावण्यासाठी आणलेले क्ले पेव्हर एकदा पालिका मुख्याधिकारी यांनी रिजेक्टदेखील केले होते. मात्र, त्याचे फळ सध्या माथेरानमध्ये दिसून येत आहे. माथेरानमधील हा एकमेव रस्ता असून, त्या रस्त्यावरील क्ले पेव्हर ब्लॉक निखळले नाहीत किंवा ते क्ले पेव्हर ब्लॉक झिजले नाहीत. त्यामुळे या रस्त्याच्या कामाची चर्चा माथेरानमध्ये सुरू असून, शासनाच्या यंत्रणा खराब झालेल्या रस्त्यावरील क्ले पेव्हर यांचे ऑडिट करणार आहे की नाही, असा सवाल माथेरानमधील विलास पाटील यांनी केला आहे.

पांडे प्ले ग्राऊंड भागातील रस्त्यात तीव्र उतार असूनदेखील रस्त्यावरील पेव्हर खराब झाले नाहीत, त्याचा अर्थ तेथे लावण्यात आलेले क्ले पेव्हर हे चांगल्या दर्जाचे आहेत आणि त्यामुळे भविष्यात माथेरानमधील रस्त्यांवर क्ले पेव्हर लावले जाणार असतील तर पांडे प्ले ग्राउंड रस्त्यावर लावलेले क्ले पेव्हर यांची मागणी करण्यात यावी, अशी सूचनादेखील विलास पाटील यांनी केली आहे.

ऑनलाईन शिक्षण बंद करा : पाटील

उरण : मोबाईलमुळे विद्यार्थ्यांचे अभ्यासातील लक्ष विचलित होत असून, शाळा-कॉलेजातील शिक्षकांनी यापुढे मोबाईलवर शिक्षणाचा वापर करू नये. मोबाईल वापरामुळे शिक्षकांचा कामाचा ताण कमी होतो, परंतु शिक्षकांनी यापुढे पारंपरिक पद्धतीनेच विद्यार्थ्यांना शिक्षण द्यावे, अशी पालकांची विनंती आहे. या सर्व गोष्टीची शिक्षणाधिकारी, शालेय शिक्षणमंत्री यांनी वेळीच दखल घेऊन ऑनलाईन शिक्षण बंद करावे, अशी मागणी तुळसीदास पाटील यांनी केली आहे. कोरोनाकाळात शाळा बंद असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून ऑनलाईन शिक्षण पद्धत चालू केली गेली. परंतु, आता सर्व परिस्थिती सुरळीत झाली असल्याने ऑनलाईन शिक्षण वेळी थांबवून शिक्षकांनी शाळेत मुलांना शिक्षण देण्यावर भर द्यावा, अशी मागणीही श्री. पाटील यांनी केली आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- रबर (नायलॉन) स्टॅम्प्स, वसंत क्लासेस, जैन मंदिरासमोर, बाजारपेठ, अलिबाग, (आधारकार्ड/कार्यालयाचे पत्र आवश्यक)
- खुषखबर खुषखबर खुषखबर 1BHK फ्लॅट 1800000/- only रेडी पजेशन, मौजे-रेवदंडा, अलिबाग o.c, Loan approved, पहिल्या ५ ग्राहकांसाठी सणानिमित्त दुचाकी स्कुटी पेप बक्षीस AB Associates Developer Mob- 9702674555
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १.रिसेप्शन २.हाऊस कीपर ३.ऑल राउंडर कूक, २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा- (व्हॉटसॲप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५/७८७५८६६५५५
- नामांकित कंपनीसाठी सेल्समन पाहिजे. आकर्षक पगार आणि Incentive संपर्क रौयल डिस्ट्रीब्युटर्स चेंढरे-अलिबाग फोन नं. ९८८१४१८४४८
- विद्यानगर येथे कॉटेजकरीता १)कुक २) टाऊसकिपींगकरीता जोडपे किंवा पुरूष/महिला पाहिजेत. संर्पक : ८३९०४२४२२२/९२७२३८३४७६
- Office staff Vacany - Graduate Candidates required Call 9923750549 for appointement Time 11 am to 5 pm
- पाहिजेत- दुकानात कामासाठी मुले पाहिजेत. हेल्पर/वायरमन/फिटर/पाण्याचे पंप मेकॅनिक इत्यादी संपर्क :- हजारे एन्टरप्रायजेस मारूती नाका, अलिबाग ९८२२००१८५३
- ता.अलिबाग येथील मौजे ढवर येथे ३ ते ३.५ गुंठे एन.ए.प्लॉटस (N.A.PLOTS) विकणे आहे. अधिक माहितीसाठी खाली दिलेल्या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा : ९८५०९५६७८२/९८५०९०२८२७
- ideal Coaching classes शिक्षीका पाहिजे. वेळ ९ ते ११ आणि ३ ते ६ अनुभवी किंवा विनाअनुभवी, विद्यानगर माय शाप समोर, मो. ९६०४१२३४११(राठोड सर)

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

मुंबई-गोवा महामार्ग हरवला धुक्यात

। सुकेळी । वार्ताहर ।

रविवारी सकाळी पडलेल्या दाट धुक्यामुळे मुंबई-गोवा महामार्ग हा पूर्णपणे धुक्यात हरवला होता. जणू काही महामार्गावर धुक्याची चादर पसरलेली दिसून येत होती. त्यातच महामार्गावरील मोठ्या प्रमाणात उडणाऱ्या धुळीमुळेदेखील वाहतुकीसाठी अडथळा निर्माण होत होता.

या दाट धुक्यामुळे वाहनचालकांना समोरचे काहीच दिसत नसल्याने वाहतूक अत्यंत धीम्या गतीने सुरू होती.

रायगड जिल्ह्यात सध्या सर्वत्र पहाटेच्या वेळी मोठ्या प्रमाणात धुके पडलेल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. रविवारी सकाळचे ९ वाजेपर्यंतदेखील धुक्याचे प्रमाण एवढे होते की, चालकांना वाहन चालवताना समोरचे ७ ते ८ फूट अंतरावरीलदेखील काहीच दिसत नव्हते. त्यामुळे अनेक वाहनचालकांनी आपली वाहने रस्त्याच्या कडेला उभी करुन ठेवली. त्यानंतर काही वेळाने धुक्याचे प्रमाण कमी झाल्यानंतरच पुन्हा वाहतूक सुरळीत सुरु झाली.

■ ढोलपाडा येथील जय भवानी मित्रमंडळाच्या वतीने प्रतिष्ठापना करण्यात आलेली आई भवानीची मूर्ती.

मुरुडच्या किनाऱ्यांवर शुकशुकाट

। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।

पर्यटनाच्या ऐन हंगामामध्ये प्रसिद्ध काशीद आणि मुरूड किनारी पर्यटकांची वर्दळ नसल्याने शुक्रवारपासून शुकशुकाट पहायला मिळत आहे. किमान काशीद किनारी शनिवार-रविवार सुट्टीच्या दिवसांत पर्यटकांची मोठी वर्दळ असते. मुरूड किनारीदेखील जंजिरा पाहणारे पर्यटक येत असतात. परंतु, सध्या फारसे पर्यटक आलेले दिसून येत नाहीत.

यामुळे पर्यटन व्यावसायिकांना नुकसानीचा फटका बसला आहे. पर्यटक येतील असा कयास गेल्या आठवड्यात काही मंडळींनी लावला होता; मात्र तो फोल ठरल्याचे दिसत आहे. काशीद येथील रहिवासी सूर्यकांत जंगम यांनी रविवारी सांगितले की, बिचवर जेमतेमच पर्यटक आले असून, करमणूक साधने म्हणजे बोटिंग वगैरे बंद असल्याने पर्यटक थांबायला तयार नाहीत.

अन् इर्शाळवाडीवासियांच्या चेहऱ्यावर फुलले हसू

। खोपोली । प्रतिनिधी ।

- **इमॅजिका परिवाराकडून एकदिवसीय सहलीचे आयोजन**

दुर्घटनाग्रस्त इर्शाळवाडीवासियांच्या आयुष्यात हरपलेल्या आनंदाला परत आणण्याचा किंचितसा प्रयत्न म्हणून इमॅजिका (मालपाणी) ग्रुपचे मालक मनीष मालपाणी आणि जय मालपाणी तसेच इमॅजिका मॅनेजमेंटकडून एकदिवसीय सहलीचे आयोजन केले होते.

इमॅजिका (मालपाणी) परिवाराकडून सहलीसाठी आलेल्या लहानथोर इर्शाळवाडीवासियांचे जोरदार स्वागत करण्यात आले. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या राईड्समधून सफर करत, विविध खेळांत रमून जात, मनोरंजनाच्या साधनांचा उपभोग घेत आणि मनसोक्त मेजवानीचा स्वाद घेतल्यानंतर प्रत्येकाच्या चेहऱ्यावर समाधान पसरलेले दिसून येत होते.

या कौटुंबिक सहलीच्या आयोजनातून आपण काही क्षणांसाठी का होईना, इर्शाळवाडीवासियांना त्या दुर्घटनेच्या धक्क्यातून बाहेर काढण्यात यशस्वी झाल्याचे प्रतिपादन इमॅजिका (मालपाणी) परिवाराकडून करण्यात आले.

माणगावचे बांधकाम रखडले, प्रेक्षक व कलावंतांमध्ये नाराजीचा सूर

नाट्यगृहाच्या अपुऱ्या निधीचे रंगले 'नाट्य'

। माणगाव । प्रतिनिधी ।

दक्षिण रायगडमधील सांस्कृतिक क्षेत्राला उत्तेजन मिळावे तसेच येथे नवनवीन व व्यावसायिक नाटक प्रेक्षकांना पाहता यावीत यासाठी याभागातील नाट्यप्रेमींच्या मागणीचा विचार करून माणगाव नगरपंचायत हद्दीत शासकीय विश्रामगृहासमोर नाट्यगृह मंजूर झाले. त्याला तब्बल सहा वर्षे लोटली तरीही या नाट्यगृहाचे बांधकाम अपूर्ण असल्याने नाट्यगृहावरच प्रश्नचिन्ह उभारले आहे. नाट्यगृहाच्या बांधकामाला पुरेसा निधी मिळाला नसल्याने या बांधकामाचे तीन तेरा वाजले असून, सहा वर्षांनंतर आता वाढीव निधीचे 'नाट्य' रंगले आहे. हे बांधकाम रखडल्याने प्रेक्षक व कलावंतांतून नाराजीचा सूर पसरला आहे.

माणगाव नगरपंचायत हद्दीमध्ये नाट्यगृह बांधकाम करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडून सुमारे चार कोटी रुपयांच्या निधीची मंजुरी सहा वर्षांपूर्वीच मिळाली होती. त्यापैकी प्रशाकीय मान्यतेचे अनुषंगाने शासन हिस्याच्या रकमेपैकी ४० टक्के रक्कम ही प्रथम हप्त्याची १,४९,०४,०८८ रुपये वितरीत करण्याबाबत शासन निर्णय पारित करण्यात आला होता. या अनुदानापैकी १४,००,००० रुपये माणगाव नगरपंचायतीकडे १९ जून २०१८ रोजी मिळाले होते. तसेच माणगाव नगरपंचायतीकडील स्वहिस्सा रक्कम रुपये २०,००,००० या कार्यालयाकडे एकूण ३४,००,००० अनुदान सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आले होते. काम जास्त अनुदानाची रक्कम कमी मिळत असल्याने बांधकाम करण्यात अनेक अडचणी येत होत्या. त्याचबरोबर सहा वर्षांपूर्वी मंजूर झालेल्या नाट्यगृहाचे इमारतीच्या अंदाजपत्रकात जो निधी मंजूर केला, त्या निधीत हे नाट्यगृह उभारू शकत नाही. सध्या शासनाकडून १ कोटी ३५ लाख रुपये सार्वजनिक बांधकाम खात्याकडे माणगाव नगरपंचायतीने निधी वर्ग केला. सध्या या इमारतीचा पाया भरून पीसीसी करण्यात आले आहे. मात्र, निधी वेळेवर मिळाला नसल्याने या बांधकामाला साडेसातीच लागली आहे. सहा वर्षांपूर्वी हे नाट्यगृह मंजूर झाले. त्यानंतर आता बराच कालावधी गेल्याने सर्वच बांधकाम साहित्याचे दर कित्येक पटीने वाढले आहेत. तसेच मजुरीही मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे नाट्यगृह बांधकामाला हा निधी अपुरा पडत आहे. त्यामुळे नाट्यगृहाच्या बांधकामाचा तिढा कायम राहणार आहे.

.. तर नाट्यसंस्कृतीला चालना मिळेल

नाट्यगृह बांधकामासाठी लागणारा पुरेसा निधीही वेळोवेळी शासनाकडून उपलब्ध करून दिल्यास माणगावच्या नाट्यसंस्कृतीला चालना मिळेल. सध्या पनवेल, रोहा, महाड येथे नाट्यगृह आहेत. तर रत्नागिरी जिल्ह्यात खेड, चिपळूण, येथे नाट्यगृह आहेत. माणगावचे नाट्यगृह ५०० बैठक आसन क्षमतेचे असल्याने तिकिटाचा दर आयोजकांना पर्यायानी वाढवावा लागणार असून, हा खर्च उभा करण्यासाठी रसिकांच्या खिशाला कात्री लागणार आहे. या नाट्यगृहाची आसन क्षमता वाढवून ७०० किंवा १००० केल्यास या नाट्यगृहात लहान-मोठे कार्यक्रम व दर्जेदार नाटक ठेवणे सोयीस्कर होईल.

पोलादपुरात इच्छुक लागले कामाला

देवळे आणि कापडे ग्रामपंचायतींच्या निवडणुकीची चर्चा जोरदार

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्यापोलादपूरग्रामपंचायतीचेनगरपंचायतीमध्ये रूपांतर झाल्यानंतर कापडे बुद्रुक ग्रुपग्रामपंचायतीला तालुक्यातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायतीचा दर्जा प्राप्त झाला. सद्यःस्थितीत कापडे बुद्रुक ग्रुपग्रामपंचायतीची एकूण मतदारसंख्या २ हजार ३९४ असून, त्यापाठोपाठ देवळे ग्रुपग्रामपंचायतीची एकूण मतदारसंख्या २ हजार २७७ आहे. दोन्ही ठिकाणी महिला सरपंचांचे आरक्षण आहे. कापडे ग्रुप ग्रामपंचायत गेल्या निवडणुकीमध्ये काँग्रेसच्या हातातून निसटून शिवसेनेच्या ताब्यात गेली असून,

यंदा याठिकाणी काँग्रेसजनांचा शिवसेना ठाकरे गटातील प्रवेश आणि शिवसेनेचा शिवसेना शिंदेगट असा उल्लेख असल्याने कापडे ग्रुप ग्रामपंचायत पुन्हा काँग्रेसकडे येण्याची शक्यता नसून, ती ठाकरे गटाकडे जाईल अथवा शिंदेगट ग्रामपंचायत राखण्यात यशस्वी होईल, याचीच चर्चा तालुक्यात सर्वत्र होत आहे. देवळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील अनेक महसुली गावे दरडग्रस्त असून, मदतकार्याचा प्रभाव अजून ओसरला नसल्याने पुनर्वसनाची प्रतिक्षा अथवा चिंता कोणालाही दिसून येत नाही.

कापडे ग्रामपंचायत राखण्याचे आव्हान

कापडे ग्रुपग्रामपंचायतीचे सत्तांतर झाल्यानंतर स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम योजनेंतर्गत नवीन इमारत कापडे बुद्रुक ग्रुप ग्रामपंचायतीला मिळाली. सर्वसाधारण महिला सरपंच सुवर्णा जितेंद्र सकपाळ यांनी सत्तेतून ही नवीन इमारत उभारली. पोलादपूर तालुक्यातील कापडे बुद्रुक ग्रुप ग्रामपंचायत विविध सरकारी योजना व स्पर्धांमध्ये अग्रेसर राहून विकासकामे करून घेणारी असा नावलौकिक ५ वर्षांपूर्वी तब्बल सलग १० वर्षांची सत्ता उपभोगणारे सरपंच अजय सलागरे यांनी निर्माण केला. येत्या पाच वर्षासाठी कापडे बुद्रुक ग्रुपग्रामपंचायतीमध्ये अनुसूचित जमाती महिला आरक्षण असल्याने कोणत्या महिला सरपंचांच्या पतीराजांचे राज्य येणार, याबाबत कापडे बुद्रुकच्या बारा वाड्यांमध्ये उत्कंठा वाढीस लागली आहे.

२०२१ मध्ये ठिकठिकाणी दरडग्रस्त होऊन पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असलेल्या देवळे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीमध्ये आपत्तीकाळात झालेल्या मदतकार्याचा प्रभाव अद्याप दिसून येत आहे. केवनाळे या महसुली गावामध्ये भूसंपादन आणि आपद्ग्रस्तांसाठी निवासी संकुल उभारणी हे महत्त्वाचे काम येत्या पाच वर्षांमध्ये पूर्णत्वास जाण्याची गरज आहे. देवळे ग्रुप ग्रामपंचायतीच्या नवनिर्वाचित महिला नागरिकांचा मागासप्रवर्ग सरपंच व्यक्तीची निवडसंख्या २ हजार २७७ मतदार करणार आहेत.

या ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये तीन प्रभागांतील ९ सदस्यांसाठी आरक्षण आणि प्रभागरचना जाहीर झाल्यानंतर प्रत्यक्ष निवडणुकीची घोषणा होईपर्यंत राजकीय सुस्तावलेपणा दिसून येत होता. मात्र, निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर याठिकाणी कोणकोण आखाड्यात उतरणार? काँग्रेसच्या मदतीने सरपंचपद डावपेचाने मिळविण्याची घटना झाल्यानंतर यापूर्वीच्या निवडणुकीमध्ये काँग्रेसमधून शिवसेनेमध्ये आलेल्या कार्यकर्त्यांच्या पत्नीला सरपंचपदाची संधी मिळाली आहे.

पोलादपूर तालुक्यातील कापडे बुद्रुक आणि देवळे ग्रुप ग्रामपंचायतीच्या निवडणुकांमध्ये शिवसेनेचे दोन गट आमनेसामने लढणार असून, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने कापडे येथे उमेदवारी लढविण्याची तयारी केली आहे. मात्र, या निवडणुकीमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शेकापक्ष तसेच भाजप अलिप्त दिसून येण्याची शक्यता आहे. सद्यःस्थितीत १६ ते २० ऑक्टोबरपर्यंत पोलादपूर तहसील कार्यालयामध्ये उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी कागदपत्र जमवाजमवीची लगबग सुरू झाली आहे.

नवरात्र उत्सवात कुलदेवतांची घटस्थापना

भावबंद मंडळी आली एकत्र

। गडब । वार्ताहर ।

महाराष्ट्रात नवरात्र उत्सवाला महत्त्वाचे स्थान असून, ग्रामीण तसेच शहरी भागात तो मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यामध्ये काही ठिकाणी मंदिरात, तर सार्वजनिक मंडळांतर्फे मूर्तीची स्थापना करुन घटस्थापना केली जाते. तसेच प्रत्येक कुटुंबामध्ये कुलदेवतांची घटस्थापना करण्यात येते.

महाराष्ट्रातील समाज कुटुंबामध्ये विस्तारलेला आहे. यामध्ये प्रत्येक भावकीचे कुलदैवत असतात. नवरात्र उत्सवात हे सर्व भावबंद मंडळी एकत्र येऊन हा उत्सव साजरा करतात. यावेळी कुटुंबात असलेली भावबंद मंडळी कुठेही राहायला गेली असली तरी ती या उत्सवात एकत्र येतात, त्यामुळे कुटुंबाची एकता पाहायला मिळते. भावकीमधील ओळख वाढते. नवीन पिढीला आपले भावबंद कोण आहेत व ते कुठे राहतात, कोणता व्यवसाय करतात, याची माहिती मिळते. नवरात्र उत्सवात काही ठिकाणी कुलदेवताची घटस्थापना कुटुंबातील भावकीतील प्रत्येकाच्या घरात आळीपाळीने साजरा होत असल्याने हा उत्सव साजरा करण्याची संधी प्रत्येकाला मिळते.

> **विभक्त कुटुंब पद्धत जरी असली, तरी व्यवसाय व नोकरीनिमित्त बाहेरगावी असलेले भावबंद नवरात्रात कुलदेवतांच्या घटस्थापनेसाठी एकत्र येतात. त्यामुळे कुटुंबातील हेवेदावे संपुष्टात येतात, विचारांची देवाणघेवाण होते. तसेच नवीन पिढीला आपले भावबंद कोण याची ओळख होते.**
>
> **– गोपिनाथ पाटील, कुटुंबप्रमुख**

माथेरान न.प. निवडणुकीबाबत अनिश्चितता

मतदारांमध्ये कमालीची नाराजी; राजकीय हालचाली मंदावलेल्याच

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरान नगरपरिषदेची निवडणूक म्हणजे बहुतांश मतदारांसाठी एक आनंददायी सोहळाच असतो. परंतु, दोन वर्षे झाली तरीसुद्धा न.प.ची निवडणूक जाहीर झालेली नाही, त्यामुळे बहुतांश मतदारांमध्ये नाराजीचा सूर उमटताना दिसून येत आहे. त्यातच अद्यापही नगराध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झालेले नसल्याने सर्वच पक्षाचे नेते गप्प बसून आहेत. तेसुद्धा वायफळ

खर्च करण्यास धजावत नाहीत अन्यथा ओल्या सुक्या पार्ट्यांच्या मेजवान्या केव्हाच सुरू झाल्या असत्या. परंतु, निवडणुकीच्या या अनिश्चिततेमुळे मतदारांमध्ये प्रचंड नाराजी दिसत असून, राजकीय हालचालीसुद्धा मंदावलेल्याच दिसत आहेत.

पक्षप्रवेशसुद्धा थंडावले असून, मतदार कार्यकर्ते कुणाचे पारडे आर्थिक दृष्टीने अधिकाधिक जड दिसेल त्याकडे आपली कूच करण्याच्या मार्गावर आहेत. दर पाच वर्षांनी प्रत्येक पक्षाचे एकच जाहीरनामे पहावयास मिळतात. परंतु, पाच वर्षांत कामे पूर्ण होतच नाहीत. पक्षाच्या खर्चावर निवडून येण्यासाठी अनेकांनी आतापासूनच गुडघ्याला बाशिंग बांधलेले आहे. २०१६ च्या निवडणुकीत जे निवडून आले आहेत, त्यांतील काही अपवाद वगळता पुन्हा एकदा संधी मिळेल याची शाश्वती नाही, त्याचीही कारणे समस्त माथेरानकरांना ज्ञात आहेत. त्यामुळे नवोदित उमेदवारांना यावेळी सभागृहात जाण्याची संधी मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेवटी सगळे एकाच माळेचे मणी आहेत. निवडून आल्यावर विविध माध्यमातून नगरपरिषदेला ओरबाडून खाण्यासाठी अनेकजण स्वप्न पाहताना दिसत आहेत.

साडेपाच लाखांचा गुटखा हस्तगत

। पनवेल । वार्ताहर ।

पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ च्या अधिपत्याखालील पोलिसांच्या पथकाने वॅग्नर गाडीतून नेला जाणारा सुमारे पाच लाख ३३ हजार रुपयांचा गुटखा पान मसाला व सुगंधीत तंबाखूचा साठा हस्तगत केला असून, यावेळी गाडीचा चालक गाडी सोडून पसार झाला आहे.

कळंबोली वसाहतीजवळील खिडूकपाडा येथून एक व्यक्ती कारमधून गुटखा पान मसाला व सुगंधीत तंबाखूचा साठा घेऊन जाणार असल्याची माहिती पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ चे उपायुक्त पंकज डहाणे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय पवार व पथकाने सदर ठिकाणी सापळा रचून त्या गाडीचा चालक माँ किराणा स्टोरसमोर थांबल्यानंतर तो गाडीतील बॉक्स व गोण्या उतरवत असल्याचे या पथकाच्या निदर्शनास आले. यावेळी सदर पथक त्याला पकडण्यासाठी धावले असता तो चलाखीने गल्लीबोळातून पळ काढून पसार झाला. त्यानंतर पोलिसांनी सदर गाडीची तपासणी केली असता गाडीमध्ये विविध प्रकारचे गुटखा, पानमासाला व सुगंधीत तंबाखूचा साठा आढळून आल्याने तो त्यांनी ताब्यात घेतला आहे.

अलिबाग नगरपरिषद
आरोग्य विभाग
फेर ई-निविदा सुचना सन २०२३-२४

अलिबाग नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडील फेर ई-निविदा सूचनेमध्ये अलिबाग नगरपालिकेचे कुत्र्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करून रेबीज लस टोचणे बाबत ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई-निविदा सूचना शासनाच्या https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१६.१०.२०२३ रोजी पासुन उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येईल.

सही/-
मुख्याधिकारी,
अलिबाग नगरपरिषद

कर्जत टेकडीवर ओपन जिम

सुवर्णा जोशी यांच्या हस्ते उद्घाटन

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेली टेकडी आबालवृद्धांचे फिरण्याचे आवडते ठिकाण. याठिकाणी बरेच नागरिक सकाळ आणि सायंकाळी फिरायला जातात. कर्जत टेकडीवर (ओपन जिम) नगर परिषदेच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली. तिचे उद्घाटन नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांच्या हस्ते करण्यात आले.

(छायाचित्र : संजय गायकवाड)

कचेरी तहसील टेकडीवर अनेकजण सकाळी मॉर्निंग वॉकसाठी तसेच सायंकाळी फिरायला येतात आणि निसर्ग मित्र मंडळ हा ग्रुप झाडे लावून, त्यांची जोपासना करण्याचे काम सातत्याने करत असतो. यामध्ये सर्व वयोगटातील निसर्गप्रेमी आहेत. बरेच ज्येष्ठ नागरिकदेखील आहेत. ते परिसर स्वच्छ ठेवण्यासही मदत करतात. त्यांच्या बऱ्याच दिवसांपासूनच्या मागणीनुसार, या परिसरात व्यायामाचे साहित्य (ओपन जिम) नगरपरिषदेच्या माध्यमातून उपलब्ध करून दिले आहे. व्यायाम झाल्यानंतर बसण्यासाठी पाच छोटे-छोटे कट्टे बनवण्यात आले आहेत.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचित करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीनमिळकत संदर्भित जमीनमिळकतीचे विद्यमान मालक श्री. दिलीप विष्णू मांजरेकर यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशिल व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली असून माझ्या अशिलांनी जमीनमालकांना बयाणा रक्कम देखील अदा केलेली आहे व तशी पावती जमीनमालकांनी माझ्या अशिलांच्या लाभात स्वाक्षरीत करून दिलेली आहे. संदर्भित जमीनमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीन मिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भात जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

संदर्भित जमीनमिळकतीचे परिशिष्ट

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग (गट नं.)	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
सारळ ता. अलिबाग जि. रायगड	३४२	०-२२-५०	६.०६

अलिबाग
दिनांक : १६/१०/२०२३

राजेंद्र दा. पाटील
ॲडव्होकेट
कृष्णवंदन-२, ब्राह्मणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.- ९८२२५२८९३१

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकाकडून कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमूद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
मौजे आंभेरपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.	पैसे
भरत राघो भगत सदाशिव कृष्णा बार्शी	६२	१ फ १	१-९४-०	३	८४
	यापैकी लिहून देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०-४०-०				
	६३	१ अ	१-७३-२०	३	६३
	यापैकी लिहून देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०-८०-०				
	६३	१ क	०-२०-०	०	१९
	६३	२	०-२९-०	०	१९
	६३	६	०-०४-०	०	२३

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : मु.पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

सही/-
ॲड. भुपेश तानाजी पेमारे
दिनांक : १६/१०/२०२३
मो.नं. ९१५८२७७७२८

भारत निवडणूक आयोग

महाराष्ट्र विधान परिषदेच्या कोकण विभाग पदवीधर मतदार संघाची मतदार यादी तयार करणे

मतदार नोंदणी नियम, १९६० चा नियम ३१ (४) प्रमाणे नोटीस

मतदार नोंदणी नियम, १९६० च्या नियम ३१ (३) नुसार मतदार नोंदणी अधिकारी कोकण विभाग पदवीधर मतदार संघ, यांनी त्यांच्या दिनांक ३० सप्टेंबर २०२३ च्या नोटीस नुसार वर उल्लेखित पदवीधर मतदार संघाचे यादीत नाव नोंदणी करण्यासाठी पात्र असलेल्या प्रत्येक व्यक्तीस असे आवाहन करतात की, मतदार नोंदणी नियम, १९६० मध्ये जोडलेला आणि दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी १. रामप्रहर आणि २. कृषीवल या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या नोटीस मधील परिशिष्ट दोन मध्ये दिलेला नमुना १८ मधील अर्ज दिनांक ०६ नोव्हेंबर २०२३ रोजी वा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत त्यांचे कार्यालयात या मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी त्याने/तिने पाठवावा किंवा पोहचवावा.

वर उल्लेखित व्यक्तींनी, त्यांनी जर अद्याप त्यांची नावे मतदार यादीत नोंदविलेली नसतील तर त्यांनी नमुना १८ मधील त्यांचे अर्ज दिनांक ०६ नोव्हेंबर २०२३ रोजी अथवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

या संदर्भात सर्व माहिती मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या www.ceo.maharashtra.gov.in या वेबसाईटवर सुद्धा उपलब्ध आहे.

ठिकाण : नवी मुंबई
दिनांक : १६/१०/२०२३

सही/-
(डॉ. महेंद्र कल्याणकर)
मतदार नोंदणी अधिकारी तथा
विभागीय आयुक्त कोकण विभाग

जिमाका/रायगड/जाहि/११९/१३३३/२०२३

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

कडवट

तरुणाई उतरली रस्त्यावर

कोल्हापूर : विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेतील भारताच्या विजयानंतर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे तरुणांनी एकच जल्लोष केला. पारंपरिक प्रतिस्पर्धी असणाऱ्या भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यामध्ये अहमदाबाद येथे सामना झाला. विजय जवळ येईल तसे राष्ट्रध्वज व भगव्या झेंड्यांसह गर्दी वाढू लागली. ध्वनिक्षेपकावर विजयी गीत वाजवत अनेकजण चौकात थिरकले.

इस्राइलने केले ट्विट

अहमदाबाद : एकदिवसीय विश्वचषक २०२३ मधील भारताच्या पाकिस्तानवरील विजयाचे पडसाद इस्राइलमध्ये देखील पडले आहेत. इस्राइनले आपल्या अधिकृत ट्विटर खात्यावरून एक ट्विट केले. छायाचित्र जोडून त्याला मभारतीय मित्राने इस्राइलला पाठिंबा दिल्याने आम्ही खूप आनंदी झालो आहोत. विश्वचषक २०२३ मध्ये भारताने पाकिस्तानवर विजय मिळवल्याने आम्हाला खूप आनंद झाला आहे.

अन् अक्रमची सटकली

लाहोर : भारत पाकिस्तान सामना झाल्यानंतर पराभूत कर्णधार बाबर आझमने भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीची टीम इंडियाच्या जर्सी-वर स्वाक्षरी घेतली. यावर अक्रम म्हणाला, मी ज्यावेळी हे फोटो पाहिले त्यावेळी मला वाटले की हे करण्याचा आजचा दिवस नाही. तुमच्या काकाच्या मुलाने सांगितलं आहे की कोहलीचा टी-शर्ट पाहिजे तर तुम्ही हे सामन्यानंतर कपडे बदलण्याच्या खोलीमध्ये करू शकता.

बाबरची खरडपट्टी

लाहोर : भारताने पाकिस्तानवर ७ गडी राखून विजय मिळवल्यानंतर, पाकिस्तानी दिग्गज आता संघाची खरडपट्टी काढत आहेत. रमीझ राजा म्हणाले की, जेव्हा तुम्ही भारताविरोधात खेळत असाल, तेव्हा तुम्हाला माहिती हवे की भारतीय मैदानात भारताला पाठिंबा देणारे आहेत, तुम्ही भारवून जाणार हे देखील मला समजते जर तुम्हाला जिंकता येत नसेल तर, निदान तुम्ही स्पर्धा तरी केली पाहिजे.

उर्वशीची मैदानात झलक

अहमदाबाद : क्रिकेट अन् उर्वशी रौतेला आता हे नवीन राहिले नाही. आयपीएल सामन्यादरम्यान अथवा भारताच्या महत्वाच्या सामन्यासाठी उर्वशी रौतेला स्टेडियममध्ये हजर राहते. अहमदाबादमध्ये भारत आणि पाकिस्तान सामना पाहण्यासाठी उर्वशी रौतेला हिने उपस्थिती लावली होती. त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट केला. नसीम शाह आणि ऋषभ पंत, हे दोघेही नाहीत, असे म्हणत नेटकऱ्यांनी उर्वशी रौतेला हिला ट्रोल केले.

धावांची टांकसाळ आणि...

विश्वचषकाचे अवघे ११ सामने संपलेत. पण भारताचे सामने वगळता इतरत्र धावांचा पाऊसच पडला. भारताने ऑस्ट्रेलिया आणि पाकिस्तान या दोन बलाढ्य प्रतिस्पर्ध्यांना दोनशे धावसंख्याही गाठू दिली नाही. मात्र दक्षिण आफ्रिकेने सव्वाचारशे धावसंख्येचा पल्ला गाठून विश्वचषकातील नवा उच्चांक नोंदविला. एवढेच नव्हे तर मात्र विश्वचषकाने मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करून विजयी झालेले संघही पाहिले. एकाच डावात तिघांची शतके हा योग दुर्मिळ मानायचा की सामन्यातील चौघांची शतके कौतुकाने पहायची, याचाच विचार मनात येतो.



विश्वचषकात असं कधी घडलं नव्हतं. भारत, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड आणि श्रीलंका यांच्या खेळाडूंनी विश्वचषकातील वेगवान शतके झळकाविली तर दक्षिण आफ्रिकेच्या ऐडन मार्करम याने विश्वचषकातील सर्वात वेगवान शतकाची नोंद केली. स्पर्धेला ११ दिवस होत नाही तोच तब्बल १२ शतकांची नोंद झाली देखील.

ही धावांची लयलूट साधीसुधी नाही. तर वेगात काढलेल्या धावा आहेत. हाराकिरी नाही तर पद्धतशीर कुटलेल्या धावा आहेत. ही धावसंख्या नोंदविताना समोरचे प्रतिस्पर्धी साधेसुधे नव्हते तर प्रतिथयश खेळाडू होते. त्यांचे सर्वोत्तम गोलंदाज गोलंदाजी करीत होते. आणि दिल्लीचा अपवाद वगळता मैदानांच्या सीमारेषा देखील वाजवीपेक्षा जवळ नव्हत्या. तरीही धावा कुटल्या गेल्या.

आत्तापर्यंतच्या विश्वचषकात असे कधीच घडले नव्हते. याची प्रामुख्याने दोन कारणे आहेत. ट्वेन्टी-२० क्रिकेटने बाळसे धरेपर्यंत, गोलंदाजांची अशी कत्तल करणे फारच धाडसाचे मानले जायचे. आता ट्वेन्टी-२० क्रिकेटचा विश्वचषक व्हायला लागलाय. ट्वेन्टी-२० क्रिकेटच्या मलिकांचा तर देशोदेशी सुळसुळाट झालाय. आणि विश्वचषकात खेळणाऱ्या सर्वच संघांच्या प्रमुख खेळाडूंसाठी एकमेकांच्या देशांमधील मैदाने परकी राहिलेली नाहीत. एवढेच नव्हे तर विविध देशांचे खेळाडू आयपीएलमध्ये खेळतात. त्यांनी भारतीय खेळाडूंपेक्षाही भारतातील मैदाने अधिक परिचित आणि जवळची आहेत. कारण त्यांचे सरावाचे कॅम्पस् येथेच होतात. अनेकांची होम ग्राऊंडस आहेत. त्यामुळे हे खेळाडू आपल्या देशाच्या मैदानाइतकेच भारतातील मैदानांशी, तेथील क्युरेटर्स ,माळी यांच्याशी सलोख्याचे संबंध ठेवून आहेत. मैदानावर नेमके दव किता वाजता पडेल? किती पडेल? याची अचूक माहिती आता परदेशी खेळाडूंनाही आहे. त्यामुळे गोलंदाजी आणि फलदांजी व क्षेत्ररक्षण करताना अनेकदा हे परदेशी खेळाडू आणि त्यांचे अंदाज भारतीयांपेक्षाही अचूक निघाले आहेत. याचाच अर्थ असा आहे की, क्रिकेटमध्ये आता सिक्रेट असे काही राहिलेले नाही. प्रत्येकाचा या विश्वचषकात अभ्यास आधीपासून झाला आहे आणि तो अचूक आहे.

Krimson Cerise
+91 9930919807
niharika.dalvi@krimsoncerise.com

प्रत्येक फलंदाजाचा भारतीय खेळपट्ट्यांचा अभ्यास झाला आहे. त्यामुळे पहिल्या ११ सामन्यातील प्रत्येकाची षटकामागील धावांची सरासरी एकत्र काढली तर ती आधीच्या सर्व विश्वचषकांपेक्षा दुप्पटीपेक्षा अधिक भरते. म्हणजे पाहा २००३, २०११ आणि २०१५ या तीन विश्वचषकातील वैयक्तिक सरासरी धावसंख्या ५ होती. आता ११ सामन्यानंतरच ही वैयक्तिक सरासरी चक्क १२ वर पोहोचली आहे.

भारतातील बहुतांशी केंद्रावर पहिल्या डावादरम्यान प्रचंड उकाडा असतो. त्यावेळचे उन असह्य असते. मात्र, दुसऱ्या डावात फलंदाजी करताना सायंकाळी, अंधारून आले की उकाडा कमी कमी होत जातो. तासाभरानंतर दव पडायला लागले की चेंडू अधिक जड व्हायला लागतो. स्पीन आणि स्वींग कमी होतो. तेथेही फलंदाजांचा फायदा होतो. त्यामुळे सुरूवातीस फलंदाज बाद झाल्यानंतर फलंदाजांना बाद करणे हे मोठे आव्हानच होऊन बसते.बातमीदाखल भारताचा ऑस्ट्रेलियाविरूद्धचा डाव पहा. ३ बाद २ अशा बिकट अवस्थेनंतर भारताने विजयासाठी आवश्यक असलेली २०० धावसंख्या आणखी अवघी एक विकेट गमावून गाठली. ९७ धावांवर नाबाद राहिलेल्या राहुलने त्यावेळी सांगितले होते की रात्री चेंडू बॅटवर व्यवस्थित येत होता. त्यामुळे फलंदाजी करणे सोपे झाले. पाकिस्तानने श्रीलंकेचे ३४५ धावांचे आव्हानदेखील सहज पार केल्यानंतर सर्वांनाच आश्चर्य वाटले होते. एवढेच नव्हे तर न्यूझीलंड, भारत अन्य संघांनी धावांचा पाठलाग किती वेगात केला होता यावरून रात्री फलंदाजी करणे सोपे असल्याचे लक्षात येते.

email : vinayakdalvi41@gmail.com

भारताचा पाकवर सात गड्यांनी मात

। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।

भारताने आतापर्यंत ८ वेळेस विश्वचषक स्पर्धेत पाकला नमवले आहे. पाकला एकदाही विजय मिळवता आलेला नाही. फलंदाजीचा बहर असलेला रोहित शर्मा (८६) आणि सामनावीर जसप्रीत बुमराहने (२/१९) सर्वोत्तम खेळीतून भारताला पाकिस्तानविरुद्ध दणदणीत विजय मिळवून दिला. यजमान भारताने जगातील सर्वात मोठ्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर ३०.३ षटकांमध्ये पाकिस्तानवर ७ गड्यांनी मात केली. पाकने प्रथम फलंदाजी करताना १९१ धावा काढल्या होत्या. प्रत्युत्तरात भारताने तीन गड्यांच्या मोबदल्यात सामना जिंकला. भारताला आपल्या घरच्या मैदानावरील एकदिवसीय विश्वचषकामध्ये विजयी हॅट्ट्रिक साजरी केली. भारताने विश्वचषकातील पाकविरुद्धची आपली विजयी मोहिम कायम ठेवली. यातून भारताला सलग आठ विश्वचषक सामन्यात पाकला धूळ चारता आली.

नरेंद्री मोदी स्टेडियमवर पाकिस्तान संघाला सामन्यादरम्यान पूर्ण ५० षटकेही आपले आव्हान कायम ठेवता आले नाही. नाणेफेक गमावल्याच्या पहिल्याच अपयशानंतर पाक संघ फलंदाजीत सातत्याने अपयशी ठरत गेला. सलामीवीर अब्दुल्ला शफिकच्या रूपाने पाक संघाला पहिला मोठा धक्का बसला. तो २० धावांची खेळी करून परतला. त्याला सिराजने पाकची धावसंख्या ४१ असताना बाद केले. त्यानंतर इमाम (३६) काही वेळापर्यंतच फटकेबाजी करू शकला. मात्र, त्याचीही विकेट पडली. त्यानंतर पाकच्या कर्णधार बाबर आझमने अर्धशतकी खेळीतून संघाला सावरण्याचा प्रयत्न केला. यातून त्याने अर्धशतकही साजरे केले. त्याने यादरम्यान आपला सहकारी रिझवानसोबत (४९) अर्धशतकी भागीदारीही रचली. सामनावीर बुमराहने ७ षटकांत १९ धावा देत २ बळी घेतले. यात एक निर्धाव षटक टाकले.

कर्णधार बाबर आझम हा संघाची धावसंख्या १५५ असताना बाद झाला. त्यानंतर पाक टीमची दाणादाण उडाली. पाकला ४२.५ षटकांत डाव गुंडाळावा लागला.पाकिस्तान संघाने ३६ धावांच्या अंतरात आठ विकेट गमावल्या. ही पडपड ३० ते ४३ व्या षटकादरम्यान झाली.भारताच्या कुलदीप यादवने सामन्यात सुरुवातीच्या पाच षटकांदरम्यान १७ निर्धाव चेंडू टाकले. पाकच्या फलंदाजांना यामुळे मोठी खेळी करता आली नाही. भारताच्या श्रेयस अय्यरने चौथ्या स्थानावरून फलंदाजी करताना शानदार अर्धशतक साजरे केले. त्याने ६२ चेंडूंमध्ये ३ चौकार आणि २ षटकारातून नाबाद ५३ धावांची खेळी केली. भारताचा माजी कर्णधार विराट कोहली तिसऱ्या स्थानावर अवघ्या १६ धावांची खेळी करून पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याच्यासारख्याच शुभमनने १६ धावा काढल्या. पाकिस्तान संघाची फलंदाजी सुमार ठरली.

स्वरा शेटगेचे स्केटिंग स्पर्धेमध्ये यश

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल येथील महात्मा स्कुल ऑफ अकॅडमी अँड स्पोर्ट्स येथे इयत्ता तिसरीत शिकणाऱ्या स्वरा शेटगे हिने जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेमध्ये यश मिळविले. रोलर स्केटिंग असोसिएशनच्या वतीने रायगड जिल्हा रोलर स्केटिंग खुली स्पर्धा २०२३ - २४ ही खोपोली येथे भरविण्यात आली होती यामध्ये स्वरा संदीप शेटगे हिने जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय व रिंकमध्ये प्रथम क्रमांक मिळवून गोल्ड मेडल पटकाविले आहे. या तिच्या भरघोस कामगिरीमुळे तिची रायगडतर्फे राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये निवड झाली आहे.

अर्जेंटिनाने केला क्रिकेटमध्ये विश्वविक्रम

। अर्जेंटिना । वृत्तसंस्था ।

अर्जेंटिनाच्या महिला क्रिकेट संघाने शनिवारी इतिहास रचला. अर्जेंटिनाच्या संघाने चिलीविरुद्धच्या टी-२० लढतीत २० षटकांमध्ये १ बाद ४२७ धावांचा पाऊस पाडला. महिलांच्या टी-२० क्रिकेटमधील एका डावात या सर्वाधिक धावा ठरल्या.

चिलीचा संघ धावांचा पाठलाग करताना ६३ धावांमध्ये गडगडला. अर्जेंटिनाने ३६४ धावांनी विजय संपादन केला. महिलांच्या टी-२० क्रिकेटमधील हा सर्वाधिक धावांनी मिळवलेला विजय ठरला. अर्जेंटिनाकडून मिळालेल्या ४२८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करणाऱ्या चिलीच्या संघाला ६३ धावाच करता आल्या. दहा खेळाडूंना एकेरीच धाव करता आल्या. जेसिका मिरांडा हिने २७ धावा केल्या. त्याआधी चिली संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण स्वीकारले. लुशिया टेलर हिने ८४ चेंडूंमध्ये २७ चौकारांची आतषबाजी करीत १६९ धावांची देदीप्यमान खेळी केली.ॲलबरटिना गलान हिने नाबाद १४५ धावांची धडाकेबाज खेळी केली. या खेळीत तिने २३ चौकार मारले. टेलर व गलान या सलामी जोडीने ३५० धावांची विक्रमी भागीदारी रचली.

पंचांना दाखविले दंड

। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।

भारत आणि पाकिस्तान सामन्यात रोहित शर्माने ६३ चेंडूत ८६ धावांची दमदार खेळी केली. या धडाकेबाज खेळीनंतर रोहित शर्मा आणि पंच इरास्मस यांच्यात संभाषण झाले. त्यावेळी रोहित शर्माने इरास्मस यांना आपल्या दंडाची बेडकी दाखवली. सोशल मीडियावर हा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला. रोहित म्हणाला,ते मला विचारत होते की तू एवढ्या लांब षटकार कसा मारतो, तुझ्या चेंडूफळीमध्ये काहीतरी आहे. मी त्यांना म्हणालो की चेंडूफळीमध्ये काही नाही ही तर ताकद आहे.

भारत भूषवणार ऑलिंपिकचे यजमानपद?

। मुंबई । वृत्तसंस्था ।

भारत २०३६मधील ऑलिंपिकच्या यजमानपदासाठी तयार झाला आहे, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुंबई आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीच्या सत्राच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केला. मुंबईतील जियो वर्ल्ड कन्वेंशन सेंटरमध्ये तीनदिवसीय सत्राचे आयोजन करण्यात येणार आहे. भारतात तब्बल ४० वर्षांनंतर आयओसी सत्र पार पडत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या सत्राचे उद्घाटन पार पडले. याप्रसंगी ते म्हणाले, ऑलिंपिक या क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्याचे स्वप्न १४० कोटी भारतीयांनी बघितले आहे. या सर्वांच्या मनातील भावना मी आपणासमोर सादर करीत आहे. तुमच्या साथीने आम्हाला भारतीयांचे स्वप्न साकार होणार आहे. भारत फक्त क्रीडाप्रेमी देश नसून आम्ही खेळ जगतो, असेही त्यांनी पुढे नमूद केले.

नरेंद्र मोदी पुढे म्हणाले, खेळ हा सर्वांसाठी आहे. खेळ केवळ विजेता निर्माण करत नाही, तर शांतता वाढवतो. खेळ हा जगाला जोडण्याचा मार्ग आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीचे बोधवाक्य वेगवान, उच्च, एकत्र, मजबूत हे खेळाला समर्पक आहेत. नरेंद्र मोदी यांनी आशियाई क्रीडा स्पर्धेमध्ये १०७ पदकांवर मोहोर उमटवलेल्या भारतीय खेळाडूंच्या कामगिरीचेही कौतुक केले. दरम्यान, भारताने २०२९मध्ये होणार असलेल्या युथ ऑलिंपिकच्या यजमानपदाचीही तयारी दर्शवली आहे.

आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समिती सत्राच्या उद्घाटनप्रसंगी भारतातील दिग्गजांची उपस्थिती होती. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीच्या सदस्या नीता अंबानी यांच्या पुढाकाराने मुंबईत या सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. बॉलीवूडमधील अभिनेते, अभिनेत्री यांनीही येथे हजेरी लावली होती.

लंकेचा कर्णधार विश्वचषकामधून बाहेर

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

एकदिवसीय विश्वचषक २०२३ मध्ये सर्व संघांसाठी दुखापत हे सर्वात मोठा टेन्शन राहिले आहे. विशेषतः श्रीलंकेचा संघ आपल्या खेळाडूंच्या दुखापतींमुळे खूप अडचणीत आला आहे. या विश्वचषकामध्ये श्रीलंकेने आतापर्यंत फक्त दोनच सामने खेळले आहे, आणि त्यांचा एक खेळाडू दुखापतीमुळे संपूर्ण स्पर्धेतून बाहेर पडला होता. हा खेळाडू दुसरा कोणी नसून संघाचा कर्णधार आहे.

मांडीच्या दुखापतीमुळे दासुन शनाका श्रीलंकेच्या संघातून बाहेर पडला आहे. त्याच्या जागी चमिका करुणारत्नेचा संघात समावेश करण्यात आला आहे. दासून शनाकाला वगळल्याने श्रीलंकेच्या संघाला मोठा धक्का बसला आहे. एकदिवसीय विश्वचषक २०२३ मध्ये श्रीलंकेच्या संघाने आतापर्यंत दोन सामने खेळले आहेत आणि या दोन्ही सामन्यांमध्ये त्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. श्रीलंकेला पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेकडून तर दुसऱ्या सामन्यात पाकिस्तानकडून पराभव स्वीकारावा लागला होता.या दोन्ही सामन्यांतील पराभवामुळे त्यांचा संघ सध्या गुणतालिकेत ० गुणासह सातव्या स्थानावर आहे. श्रीलंका अजूनही पहिल्या विजयाच्या प्रतिक्षेत आहे. श्रीलंकेला पुढचा सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळायचा आहे. हा सामना १६ ऑक्टोबर रोजी होणार आहे. हा सामना जिंकणे त्यांच्यासाठी सोपे नसेल. न्यूझीलंडचा कर्णधार विल्यमसन ही बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात जखमी झाला होता. एक चेंडू त्याच्या अंगठ्याला लागला त्यामुळे त्याला दुखापत झाली. त्यावेळी विल्यमसन ७८ धावांवर दुखापतीने निवृत्त झाला. आता स्कॅन केल्यानंतर केन विल्यमसनच्या अंगठ्याला दुखापत झाल्याचे आढळून आले आहे. यापूर्वी त्याच्या पायाला दुखापत झाली होती, त्यामुळे तो अनेक महिने क्रिकेटच्या मैदानापासून दूर होता.

मुंबई विद्यापीठ कोकण विभागीय आंतरमहाविद्यालयीन खो-खो स्पर्धा

जेएसएम अलिबागच्या मुलींनी पटकावले विजेतेपद

। म्हसळा । वार्ताहर ।

वसंतराव नाईक कला आणि वाणिज्य महाविद्यालय आणि बॅ.ए.आर. अंतुले विज्ञान महाविद्यालय यांच्या विद्यमाने मुंबई विद्यापीठ कोकण विभागीय आंतरमहाविद्यालयीन मुलींची खो-खो स्पर्धा म्हसळा येथे संपन्न झाली.या स्पर्धेत जेएसएम महाविद्यालय अलिबाग अंतिम विजेता तर उपविजेता म्हणून व्ही. एन. सी. कॉलेज आणी बॅ. ए. आर अंतुले विज्ञान महाविद्यालय म्हसळा आणी तिसरा क्रमांक द. ग. तटकरे महाविद्यालय तळा यांनी पटकावला.

या स्पर्धेचे उद्घाटन पोलीस निरीक्षक संदीपान सोनावणे यांचे हस्ते करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालय विकास समिती विश्वस्त सचिव प्रतिनिधी फझल हलडे,उपनगराध्यक्ष संजय दिवेकर, शशांक उपशेट्ये, आर. एस. कदम,महाविद्यालय विकास समिती सदस्या निलम वेटकोळी,निजाम कागदी, नासिर मिठागरे,शकूर घनसार,शब्बीर काझी,नगरसेविका सरोज म्हशीलकर, मंगेश म्हशीलकर, प्राचार्य दिगंबर टेकळे आदि मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी खेळाडूंना मार्गदर्शन करताना सोनावणे यांनी सांगितले की, शासनाच्या अनेक योजना आणी उपक्रम असून त्या फार कमी प्रमाणात अमलात आणल्या जातात. त्या योग्य प्रमाणात अमलात आणल्या तर शैक्षणिक, सांस्कृतिक आणी क्रीडा विषयक प्रगती झपाट्याने होण्यास मदत होईल. खेळामुळे शरीर निरोगी आणी सुदृढ होण्यास निश्चितपणे मदत होते असा सल्लाही सोनावणे यांनी दिला. या स्पर्धाचा बक्षिस समारंभ नाजीम चोगले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात संपन्न झाला. पंच म्हणून कल्पेश पाटील, अमोल जाधव, आकाश खांडेकर, अमोल मोरे, लावण्य मगर, राकेश म्हात्रे, ऋतिक पवार यांनी उत्तम कामगिरी केली तर डॉ. फराह जलाल, वैशाली पाटिल, मुक्ता तुरे यांनी उत्तम प्रकारे वैद्यकीय सेवा दिली.

भारत गुणतालिकेत अव्वल

। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।

भारताने विश्वचषक २०२३ मधील आपला तिसरा सामना जिंकला. पाकिस्तानचा ७ गडी आणि १९.३ षटके राखून पराभव करत भारताने दणदणीत धावगती कमावली. याचा फायदा भारताला गुणतालिकेमध्ये झाला आहे. भारत आता तीन पैकी तीन सामने जिंकून ६ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. भारताची धावगती + १.८२१ इतकी आहे.भारतासोबतच न्यूझीलंडचे देखील सहा गुण झाले आहेत. मात्र त्यांची धावगती +१.६०४ इतकी आहे.

या दोन संघांनंतर तिसऱ्या क्रमांकावर आपले दोन्ही सामने जिंकून ४ गुणांसह दक्षिण आफ्रिका विराजमान आहे. मात्र पहिल्याच सामन्यात ४२८ धावा केल्याने त्यांचे नेट रनरेट हे +२.३६० इतके तगडे आहे. त्यामुळे त्यांनी १७ तारखेचा नेदरलँडविरूद्धचा सामना जिंकला की ते पुन्हा गुणतालिकेत अव्वल स्थानावर जातील. गुणतालिकेत चौथ्या स्थानावर ३ पैकी २ सामने जिंकणारा पाकिस्तान चौथ्या स्थानावर आहे. मात्र त्यांचे नेट रनरेट हे -०.१३७ झाले असल्याने ते धोक्याच्या क्षेत्रात पोहचले आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)